सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

**सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४**

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४

(दिनांक २० ऑक्टोबर १९९९ पर्यंत सुधारलेला)

**Maharashtra Act No. IV of 1975**

# The Mumbai Metropolitan Region Development Authority Act, 1974

*(As modified upto 20th October 1999)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद ४३१ ००१ यांच्याद्वारे मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशने संचालनालये, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२००६

[किंमत रु. ९.००]

## सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४

## अनुक्रमणिका


उद्देशिका. पृष्ठ

प्रकरण एक

प्रारंभिक

कलमे

| | | |
|---|---|---|
| १ | संक्षिप्त नाव व प्रारंभ .. .. .. .. | २ |
| २ | व्याख्या .. .. .. .. | २ |

प्रकरण दोन

प्राधिकरण स्थापन करणे व ते घटित करणे

| | | |
|---|---|---|
| ३ | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची स्थापना .. .. | ३ |
| ४ | महानगर प्राधिकरणाची रचना .. .. .. .. | ३ |
| ४-क | सभापती, महानगर आयुक्त, इ. चे अधिकार व कर्तव्ये .. .. | ४ |
| ५ | महानगर प्राधिकरणाच्या बैठकी .. .. .. .. | ५ |
| ६ | (वगळण्यात आले) .. .. .. .. | ५ |
| ७ | कार्यकारी समितीची घटना व तिचे अधिकार .. .. .. | ५ |
| ७-क | प्राधिकरण आणि कार्यकारी समिती यांचे आदेश, इत्यादींचे अधिप्रमाणन .. | ६ |
| ८ | (वगळण्यात आले) .. .. .. .. | ६ |
| ९ | समित्यांची घटना .. .. .. .. | ६ |
| १० | सदस्य हे राज्य विधानमंडळाचे किंवा स्थानिक प्राधिकरणाचे सदस्य म्हणून निवडणूक लढविण्यास किंवा सदस्य असण्याचे चालू राहण्यास निरर्ह न ठरणे | ७ |
| १०-क | सहाय्य किंवा सल्ला देण्यासाठी शासनाच्या आणि स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना बोलविण्याची तरतूद. | ७ |

प्रकरण तीन

अधिकारी व कर्मचारी

| | | |
|---|---|---|
| ११ | प्राधिकरणाचे अधिकारी व कर्मचारी .. .. .. .. | ८ |

प्रकरण चार

प्राधिकरणाचे अधिकार व कार्ये

| | | |
|---|---|---|
| १२ | महानगर प्राधिकरणाची कार्ये .. .. .. .. | ९ |
| १३ | इतर कोणत्याही प्राधिकरणाने किंवा व्यक्तीने प्राधिकरणाच्या परवानगीशिवाय विवक्षित विकासाचे काम हाती न घेणे. | १० |
| १४ | महानगर प्राधिकरणाचा निदेश देण्याचा अधिकार .. .. .. | ११ |
| १५ | विवक्षित प्रकरणांमध्ये स्थानिक प्राधिकरणास जबाबदारी घेण्यास फर्माविण्याचा महानगर प्राधिकरणाचा अधिकार.. | १२ |

अनुक्रमणिका—चालू


| कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| १६ | कोणत्याही योजनेची अंमलबजावणी करण्याचा महानगर प्राधिकरणाचा अधिकार. | १२ |
| १६-क | विवक्षित कंपन्यांच्या किंवा सहकारी संस्थांच्या भागभांडवलास अभिदान देण्याचा अधिकार महानगर प्राधिकरणाला असणे. | १३ |
| १७ | प्रदेशाच्या एकात्मीकृत विकासाच्या प्रयोजनाव्यतिरिक्त, मुंबई महानगरपालिकेच्या आवश्यक आणि स्वेच्छाधीन कर्तव्यांमध्ये मोडणाऱ्या बाबींसाठी प्राधिकरण सर्वसाधारणपणे तरतूद करणार नाही. | १३ |


प्रकरण पाच

**वित्त व्यवस्था, अर्थसंकल्प आणि लेखे**


| | | |
|---|---|---|
| १८ | महानगर प्राधिकरणाचे निधी .. .. .. .. | १४ |
| १८-क | कर्ज निधी .. .. .. .. | १४ |
| १९ | राखीव व इतर निधी .. .. .. .. | १५ |
| २० | निधींचे उपयोजन, इत्यादी .. .. .. .. | १५ |
| २१ | महानगर प्राधिकरणाला पैसा कर्जाऊ घेण्याचा अधिकार .. .. | १५ |
| २१-क | महानगर प्राधिकरणास प्रकल्प व परियोजना यांसाठी वित्तव्यवस्था करण्याचा व त्यासाठी शर्ती लादण्याचा अधिकार. | १५ |
| २१-ख | प्राधिकरणाने घेतलेल्या किंवा त्याने दिलेल्या कर्जांना राज्याची हमी .. | १६ |
| २२ | लेखे व लेखापरीक्षा .. .. .. .. | १६ |
| २३ | अर्थसंकल्प .. .. .. .. | १६ |
| २४ | वार्षिक अहवाल .. .. .. .. | १६ |
| २४-क | प्राधिकरणाचे व्यवहार तोट्यात न चालविणे .. .. | १६ |


प्रकरण सहा

**कराधानविषयक अधिकार**


| | | |
|---|---|---|
| २५ | इमारती व जमिनी यांवर उपकर बसवण्याचा अधिकार .. .. | १७ |
| २६ | सुधार आकार बसविण्याचा महानगर प्राधिकरणाचा अधिकार .. .. | १७ |
| २७ | महानगर प्राधिकरणाने सुधार आकार निर्धारित करणे .. .. | १८ |
| २८ | लवादाद्वारे सुधार आकाराबाबत समझोता .. .. .. | १८ |
| २९ | सुधार आकार देणे .. .. .. .. | १९ |
| ३० | सुधार आकार हा, जमिनीवरील प्रथम भार असणे .. .. | १९ |


प्रकरण सात

**महानगर प्राधिकरणास विवक्षित अधिनियमितो रूपभेदांसह किंवा रूपभेदांशिवाय लागू करणे किंवा त्यापासून सूट देणे**


| | | |
|---|---|---|
| ३१ | विवक्षित रूपभेद इत्यादींसह विवक्षित अधिनियमितो प्राधिकरणास लागू करणे .. | १९ |


प्रकरण आठ

**जमिनीचे संपादन**


| | | |
|---|---|---|
| ३२ | जमीन संपादन करण्याचा राज्य शासनाचा अधिकार .. .. | २० |
| ३३ | जमिनीचा कब्जा असणाऱ्या व्यक्तीस राज्य शासन इत्यादींना जमीन [illegible] करण्यास किंवा तिचा कब्जा सुपूर्द करण्यास फर्माविण्याचा राज्य शासनाचा अधिकार. | २० |
| ३४ | संपादनासाठी रक्कम मिळण्याचा अधिकार .. .. | २१ |

अनुक्रमणिका–समाप्त

## नगरपालिका क्षेत्रांतील जमिनी


| कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| ३५ | नगरपालिका क्षेत्रांतील जमिनींच्या संपादनाबद्दल रक्कम निर्धारित करण्याची मूलतत्त्वे. | २१ |
| ३६ | भूमी संपादनाबद्दलच्या रकमेचे संविभाजन .. .. | २१ |
| ३७ | संपादनाची रक्कम देणे किंवा ती न्यायालयात जमा करणे .. .. | २२ |
| ३८ | संपादन इ. बद्दलची रक्कम निर्धारित करण्यासंबंधातील सक्षम प्राधिकाऱ्याचा अधिकार. | २२ |
| ३९ | व्याज देणे .. .. .. .. | २२ |
| ४० | सक्षम प्राधिकाऱ्याची नेमणूक .. .. .. .. | २२ |
| ४१ | न्यायाधिकरणाची नेमणूक .. .. .. .. | २२ |


## ग्रामीण क्षेत्रातील जमिनी


| | | |
|---|---|---|
| ४२ | ग्रामीण क्षेत्रांमधील भूमी संपादनासाठी रक्कम ठरविण्याची मूलतत्त्वे व इतर कार्यपद्धती. | २३ |


## पर्यायी निवास व्यवस्था


| | | |
|---|---|---|
| ४३ | संपादन करण्यात आलेली कोणतीही इमारत पाडण्यात यावयाची असेल त्या बाबतीत निवासी जागांच्या भोगवटादारांसाठी पर्यायी निवास व्यवस्था. | २३ |


## प्रकरण नऊ

## संकीर्ण


| | | |
|---|---|---|
| ४४ | प्राधिकरणाला देय असलेल्या पैशांची जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसुली करणे. | २४ |
| ४५ | स्थानिक प्राधिकरणांनी बसवलेल्या करांऐवजी प्राधिकरणाकडून ठोक रकमेचे अंशदान. | २४ |
| ४६ | विवक्षित प्रकरणी प्राधिकरणाची मागणी पूर्ण करण्यासाठी वेतनातून किंवा मजुरीतून रक्कम वजा करणे. | २५ |
| ४६-क | राज्य शासनाचे नियंत्रण .. .. .. .. | २५ |
| ४६-ख | विवरणे, अहवाल, इत्यादी मागविण्याचा प्राधिकरणाचा अधिकार .. .. | २५ |
| ४६-ग | अधिकार सोपविणे .. .. .. .. | २५ |
| ४७ | महानगर प्राधिकरणाचे अधिकारी व इतर कर्मचारी लोकसेवक असणे .. | २६ |
| ४८ | दायित्व निराकरण .. .. .. .. | २६ |
| ४९ | नियम करण्याचा अधिकार .. .. .. .. | २६ |
| ५० | विनियम करण्याचा अधिकार .. .. .. .. | २६ |
| ५१ | इतर कायद्यांशी विसंगत अशा तरतुदींचा प्रभाव .. .. .. | २७ |
| ५२ | अडचणी दूर करण्याचा अधिकार .. .. .. .. | २७ |
| | अनुसूची एक. | |
| | अनुसूची दोन. | |
| | अनुसूची तीन. | |

# सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४[१].

## [मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४.]

**(राष्ट्रपती यांची संमती दिनांक १८ जानेवारी १९७५ रोजी मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्र भाग चार, असाधारण, दिनांक २२ जानेवारी १९७५ यामध्ये प्रथम प्रसिद्ध करण्यात आला.)**

या अधिनियमात पुढील अधिनियम व आदेश याअन्वये सुधारणा करण्यात आल्या आहेत :—

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६*

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५९† (१३ ऑक्टोबर १९७५)‡

सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९§ (१६ जून १९७६) ¶

सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०@ (२० मे १९८३)‡

सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१ (१७ नोव्हेंबर १९८७)‡

सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९ (२ नोव्हेंबर १९८९)‡

सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५

**बृहन्मुंबई आणि सभोवतालची विवक्षित क्षेत्रे मिळून एक मुंबई महानगर प्रदेश बनविणे, त्या प्रदेशातील क्षेत्रांच्या योग्य, सुव्यवस्थित आणि जलद विकासाचे नियोजन करणे, त्याचा समन्वय साधणे व त्यावर देखरेख ठेवणे आणि अशा विकासाच्या योजना, प्रकल्प आणि परियोजना यांची अंमलबजावणी करणे या प्रयोजनांसाठी एक प्राधिकरण स्थापन करण्याची तरतूद करणे आणि त्यांच्याशी संबंधित बाबींची तरतूद करणे यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** बृहन्मुंबई आणि सभोवतालची विवक्षित क्षेत्रे अधिकाधिक विकसित होत आहेत व तेथे लोकवस्तीही वाढत आहे आणि या क्षेत्रांचा मिळून मुंबई महानगर प्रदेश बनवणे आणि जेथे सध्या अनेक स्थानिक प्राधिकरणे त्यांच्या स्वतःच्या अधिकारितेत असे विषय स्वतंत्रपणे हाताळीत आहेत अशा या क्षेत्रांच्या, योग्य, सुव्यवस्थित आणि जलद विकासाचे नियोजन करणे, त्यांचा समन्वय साधणे व त्यांवर देखरेख ठेवणे या प्रयोजनांसाठी एखाद्या प्राधिकरणाची स्थापना करणे; [२][ या महानगर प्रदेशाच्या विकासाच्या योजना, प्रकल्प आणि परियोजना स्वतः किंवा अन्य प्राधिकरणाद्वारे आखून त्या अमलात आणणे अशा प्राधिकरणास शक्य होईल अशी तरतूद करणे ] आणि पूर्वोक्त प्रयोजनांशी संबंधित बाबींची तरतूद करणे, या गोष्टींची वाढती गरज भासत आहे; **त्याअर्थी,** याद्वारे, भारतीय गणराज्याच्या पंचविसाव्या वर्षी, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग पाच, पृष्ठ १०२२ (इंग्रजी) पहा.

[२] " या महानगर प्रदेशाच्या विकासाच्या योजना " या शब्दांनी सुरू होणाऱ्या व "अशी तरतूद करणे, " या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी " या महानगर प्रदेशाच्या विकासाच्या योजना, प्रकल्प व परियोजना स्वतः किंवा अन्य प्राधिकरणाद्वारे आखून त्या अमलात आणणे, अशा प्राधिकरणास शक्य होईल अशी तरतूद करणे " हा मजकूर सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ५९ च्या कलम २ अन्वये समाविष्ट करण्यात आला.

* सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ च्या कलम ९ अन्वये सन १९७५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १ निरसित करण्यात आला. या अधिनियमाच्या कलम २(अ) च्या आणि कलमे ४ ते ८ च्या (दोन्ही धरून) तरतुदी २६ ऑगस्ट १९७५ रोजी अमलात आल्या आणि उर्वरित तरतुदी १० मे १९७५ पासून अमलात आल्याचे मानण्यात आले [सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ चे कलम १(२) पहा.].

† सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५९ च्या कलम २ अन्वये सन १९७५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक सोळा निरसित करण्यात आला.

‡ अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

§ सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ च्या कलम २२ अन्वये, सन १९७६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक सहा निरसित करण्यात आला.

¶ कलम १४ वगळता, हा अधिनियम अमलात आल्याचा दिनांक दर्शविते. सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ चे कलम १(२) पहा. कलम १४ हे २१ जुलै १९७६ रोजी अमलात आले.

@ सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० च्या कलम १४ अन्वये, सन १९८३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक दहा निरसित करण्यात आला.

## प्रकरण एक

### प्रारंभिक

संक्षिप्त नाव व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ असे म्हणावे.

(२) राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमील अशा [दिनांकास][१] तो अमलात येईल.

व्याख्या. २. संदर्भानुसार अन्य अर्थ अभिप्रेत नसेल तर, या अधिनियमात,—

(क) " सुखसोय " यामध्ये, मार्ग पूल, दळणवळणाची इतर कोणतीही साधने, परिवहन, पाणीपुरवठा व वीजपुरवठा, ऊर्जेच्या संबंधातील इतर कोणतेही साधन, रस्त्यावरील दिवाबत्ती, जलनिस्सारण व्यवस्था, मलप्रणाल व साफसफाई आणि या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ राज्य शासन, प्राधिकरणाशी विचारविनिमय करून, वेळोवेळी, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे सुखसोय म्हणून विनिर्दिष्ट करील अशी अन्य कोणतीही सोय यांचा समावेश होतो;

(ख) " मुंबई महानगर प्रदेश " किंवा " महानगर प्रदेश " म्हणजे अनुसूची एकमध्ये विनिर्दिष्ट केलेले क्षेत्र. राज्य शासनाला वेळोवेळी, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, अनुसूचीत भर घालून किंवा अशा अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेले कोणतेही क्षेत्र तीमधून वगळून तीत सुधारणा करता येईल आणि त्यानंतर फेरबदल करण्यात आलेले क्षेत्र हे, मुंबई महानगर प्रदेश असेल :

परंतु, राज्य शासन, अशी कोणतीही अधिसूचना, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मसुद्याच्या स्वरूपात मांडल्याशिवाय आणि दोन्ही सभागृहांनी संमती दिलेल्या ठरावाद्वारे तिला मान्यता मिळाल्याशिवाय काढणार नाही ; आणि अशा मान्यतेनंतर अधिसूचना काढता येईल आणि ज्या स्वरूपात ती मान्य झाली असेल, त्याच स्वरूपात ती अमलात येईल;

(ग) व्याकरणिक रूपभेदांसह " विकास " या संज्ञेमध्ये कोणत्याही जमिनीत किंवा तिच्यावर (समुद्र, खाडी, नदी किंवा सरोवर किंवा इतर कोणत्याही पाण्याखालील जमीन धरून), इमारतीचे बांधकाम, अभियांत्रिकी काम, खाणकाम, किंवा इतर कामे करणे किंवा कोणत्याही इमारतीत किंवा जमिनीत किंवा कोणत्याही इमारतीच्या किंवा जमिनीच्या वापरात कोणताही महत्त्वाचा बदल करणे याचा अंतर्भाव होतो. व त्यामध्ये, कोणत्याही जमिनीच्या उपविभागाचा पुनर्विकास व आखणी तसेच सुखसोयीविषयक तरतूद आणि कृषिविकास, फलोत्पादन, पुष्पसंवर्धन, वनशास्त्र, दुग्धव्यवसायविकास, कुक्कुट पैदास क्षेत्र, सूकरालय, पशुपैदास, मत्स्यव्यवसाय व तशाच प्रकारची इतर कामे यांच्या विकासाचे प्रकल्प व परियोजना यांचा समावेश होतो आणि " विकास करणे " या शब्दप्रयोगाचा त्यानुसार अर्थ लावण्यात येईल;

(घ) " जमीन " यामध्ये जमिनीपासून आणि भूमीशी संलग्न असलेल्या किंवा भूमीशी संलग्न असलेल्या कोणत्याही अन्य वस्तूंशी कायम जखडलेल्या वस्तू यांपासून मिळणाऱ्या लाभांचा समावेश होतो;

(ङ) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित केलेले असा आहे ;

(च) " प्रादेशिक योजना " याचा अर्थ, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या तरतुदींअन्वये, या अधिनियमांमध्ये व्याख्या केल्याप्रमाणे मुंबई महानगर प्रदेशाच्या किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या विकासाची किंवा पुनर्विकासाची योजना असा आहे आणि त्यामध्ये, उक्त प्रदेशासाठी किंवा त्याच्या कोणत्याही भागासाठी तयार केलेल्या—त्या त्या वेळी अमलात असलेल्या या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी किंवा त्यानंतर तयार केलेल्या प्रारूप किंवा अंतिम प्रादेशिक योजनेचा समावेश होतो; १९६६ चा महा. ३७.

[१] २६ जानेवारी १९७५ (शासकीय अधिसूचना, नगरविकास, आरोग्य व गृहनिर्माण विभाग, क्रमांक बीएमआरडीए १०७४/एमइटी/सीईएल-एल, २४ जानेवारी १९७५ पहा.)

(छ) " विनिमय " याचा अर्थ, या अधिनियमान्वये करण्यात आलेला विनियम असा होतो ;

(ज) " नियम " याचा अर्थ, या अधिनियमान्वये करण्यात आलेला नियम असा होतो ;

१९६६ चा महा. ३७. (झ) या अधिनियमात वापरण्यात आलेले परंतु त्यामध्ये व्याख्या करण्यात न आलेले शब्द व शब्दप्रयोग यांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मध्ये जे अर्थ नेमून देण्यात आले असतील तेच अर्थ असतील.

## प्रकरण दोन

### प्राधिकरण स्थापन करणे व ते घटित करणे

३. (१) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर शक्य तितक्या लवकर, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, " मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण " (यात यापुढे ज्याचा " महानगर प्राधिकरण " किंवा " प्राधिकरण " असा निर्देश करण्यात आला आहे) या नावाने संबोधण्यात येणारे एक प्राधिकरण स्थापन करील. **मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची स्थापना.**

(२) महानगर प्राधिकरण ही एक कायद्याने संस्थापित संस्था असेल, त्याची अखंड अधिकार परंपरा असेल आणि त्याची एक सामान्य मुद्रा असेल, तसेच, या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, त्यास, जंगम व स्थावर अशी दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन करण्याचा, धारण करण्याचा आणि तिचा विनियोग करण्याचा अधिकार असेल आणि उपरोक्त संस्थापित नावाने त्यास किंवा त्याच्यावर दावा लावता येईल.

१९०४ चा मुंबई १. (३) महानगर प्राधिकरण हे मुंबई सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १९०४ यात व्याख्या केलेल्या " स्थानिक प्राधिकरण " या शब्दाच्या अर्थानुसार स्थानिक प्राधिकरण असल्याचे मानण्यात येईल.

१९८३ चा महा. १. [१][४. (१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सुधारणा) अधिनियम, १९८३ याच्या प्रारंभाच्या दिनांकास व त्या दिनांकापासून, महानगर प्राधिकरण हे, विद्यमान सदस्यांऐवजी पुढील सदस्यांचे मिळून होईल :— **महानगर प्राधिकरणाची रचना.**

(एक) नगरविकास मंत्री ;

(दोन) गृहनिर्माण मंत्री ;

(तीन) नगरविकास राज्यमंत्री ;

(चार) मुंबईचे महापौर ;

(पाच) सभापती, स्थायी समिती, बृहन्मुंबई महानगरपालिका ;

(सहा), (सात) आणि (आठ) बृहन्मुंबई महानगरपालिकेने निवडून दिलेले महानगरपालिकेचे तीन सदस्य ; ही निवडणूक, प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या पद्धतीने, एकल संक्रमणीय मताद्वारे गुप्त मतदानाने घेण्यात येईल ;

(नऊ) आणि (दहा) राज्य शासनाने नामनिर्दिष्ट करावयाचे, मुंबई महानगर प्रदेशाच्या हद्दीमध्ये पूर्णतः किंवा अंशतः येणाऱ्या मतदारसंघांचे प्रतिनिधित्व करणारे, महाराष्ट्र विधानसभेचे दोन सदस्य ;

(अकरा) राज्य शासनाने नामनिर्दिष्ट करावयाचा, महाराष्ट्र विधानपरिषदेचा एक सदस्य ;

(बारा) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन ;

(तेरा) महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका ;

(चौदा) सचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास ;

---

[१] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० च्या कलम २ द्वारे मूळ कलमांऐवजी कलमे ४ व ४-क समाविष्ट करण्यात आली.

(पंधरा) सचिव, महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग ;

(सोळा) व्यवस्थापन संचालक, महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ ;

(सतरा) महानगर आयुक्त.

(२) नगरविकास मंत्री हा प्राधिकरणाचा सभापती असेल आणि महानगर आयुक्त हा सदस्य-सचिव असेल.

(३) उक्त अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास काही सदस्य निवडलेले किंवा नामनिर्दिष्ट केलेले किंवा नेमण्यात आलेले नसल्यामुळे किंवा इतर कोणत्याही कारणाने त्या दिवशी पदग्रहणासाठी उपलब्ध नसल्यामुळे कोणत्याही जागा रिकाम्या राहिल्या तरी त्या दिनांकास प्राधिकरणाची रीतसर घटना झाली असल्याचे मानण्यात येईल व वेळोवेळी उपलब्ध असणारे प्राधिकरणाचे सदस्य, त्या दिनांकापासून प्राधिकरणाची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यास व सर्व अधिकारांचा वापर करण्यास सक्षम होतील.

(४) राज्य शासनास वेळोवळी, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, पोट-कलम (१) च्या खंड (सहा), (सात) आणि (आठ) अन्वये निवडलेल्या किंवा खंड (नऊ), (दहा) आणि (अकरा) अन्वये नामनिर्दिष्ट केलेल्या सदस्यांची नावे प्रसिद्ध करता येतील.

(५) प्राधिकरणाच्या किंवा त्याच्या कोणत्याही समितीच्या किंवा निकायाच्या बैठकींना उपस्थित राहण्यासाठी किंवा सदस्य म्हणून इतर कोणतीही कार्य पार पाडण्यासाठी केलेला वैयक्तिक खर्च भागवण्यासाठी, सदस्यांना, विनियमांद्वारे ठरवण्यात येतील असे भत्ते मिळतील. अशा विनियमांना राज्य शासनाची पूर्वमान्यता आवश्यक असेल.

(६) एखादी व्यक्ती विधानमंडळाची किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाची किंवा समितीची किंवा निकायाची सदस्य असल्याच्या किंवा कोणतेही अधिकारपद धारण करीत असल्याच्या कारणाने प्राधिकरणाची सदस्य होईल किंवा निवडून दिली जाईल किंवा नामनिर्दिष्ट केली जाईल किंवा नेमली जाईल त्या बाबतीत, यथास्थिति, तिने ते अधिकारपद धारण करण्याचे किंवा ती, तशी सदस्य असण्याचे बंद होताच, ती प्राधिकरणाची सदस्य असण्याचे बंद होईल.

(७) पदसिद्ध सदस्यांव्यतिरिक्त, प्राधिकरणाच्या एखाद्या सदस्याला, कोणत्याही वेळी, सभापतीला संबोधून आपल्या अधिकारपदाचा सहीनिशी लेखी राजीनामा देता येईल.

(८) महानगर प्राधिकरण किंवा त्याची कोणतीही समिती किंवा अन्य निकाय यांची कोणतीही कृती अथवा कार्यवाही कोणत्याही वेळी पुढील कारणांनी विधिअग्राह्य झाल्याचे समजण्यात येणार नाही--.

(क) प्राधिकरणाचे किंवा त्याच्या समितीचे किंवा निकायाचे कोणतेही सदस्य रीतसर निवडलेले, नामनिर्दिष्ट केलेले किंवा नेमण्यात आलेले नसतील किंवा रचनेच्या वेळी पदग्रहण करण्यास अथवा प्राधिकरणाच्या किंवा त्याच्या समितीच्या किंवा निकायाच्या कोणत्याही बैठकीला कोणत्याही इतर कारणामुळे उपलब्ध नसतील किंवा त्याच्या रचनेमध्ये कोणताही दोष असेल किंवा कोणतीही व्यक्ती एकापेक्षा अधिक नात्यांनी सदस्य असेल किंवा अशा कोणत्याही सदस्यांची एखादी जागा किंवा अशा सदस्यांच्या अनेक जागा रिकाम्या असतील ;

(ख) प्राधिकरणाच्या किंवा अशा समितीच्या अथवा निकायाच्या कार्यपद्धतीमध्ये ज्यामुळे विचाराधीन बाबींच्या गुणावगुणांवर परिणाम होतो अशी कोणतीही नियमबाह्यता असेल.

**सभापती, महानगर आयुक्त, इ. चे अधिकार व कर्तव्ये.**

**४-क.** (१) प्राधिकरणाचा सभापती, प्राधिकरणाच्या वतीने सर्व कामाचे पर्यवेक्षण व नियंत्रण करील आणि या अधिनियमाद्वारे त्याच्यावर सोपविण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करील व कर्तव्यांचे पालन करील आणि प्राधिकरण विनियमांद्वारे वेळोवेळी ठरवील अशा इतर अधिकारांचा वापर करील व इतर कर्तव्यांचे पालन करील.

(२) (क) पोट-कलम (१) च्या तरतुदींना अधीन राहून, महानगर आयुक्त हा, प्राधिकरणाचा मुख्य कार्यकारी अधिकारी असेल.

(ख) महानगर आयुक्त प्राधिकरणाचे सर्व अधिकारी व कर्मचारी आणि प्राधिकरणाकडे किंवा त्याच्या कोणत्याही समितीकडे किंवा निकायाकडे वेळोवेळी प्रतिनियुक्तीवर नेमलेले कोणतेही शासकीय अधिकारी यांचे पर्यवेक्षण व नियंत्रण करील.

(ग) महानगर आयुक्त हा, प्राधिकरणाला येणे असलेल्या सर्व रकमांच्या वसुलीस आणि प्राधिकरणाने देणे असलेल्या सर्व रकमांच्या प्रदानास जबाबदार असेल. तो प्राधिकरणाच्या सर्व मत्ता आणि रोख शिल्लक यांच्या सुरक्षिततेची पुरेशी व्यवस्था आहे याची खात्री करून घेईल. त्याचप्रमाणे तो, प्राधिकरणाच्या कामाशी संबंधित सर्व कार्यकारी स्वरूपांची कार्ये पार पाडण्यास जबाबदार असेल.

(३) पोट-कलम (२) च्या तरतुदींना अधीन राहून, कार्यकारी समितीने, कलम ११ खाली नेमलेल्या कोणत्याही अपर, उप व सहायक महानगर आयुक्तांचे अधिकार व कर्तव्ये, आदेशांद्वारे वेळोवेळी ठरवील.].

**महानगर प्राधिकरणाच्या बैठकी.**

५. (१) महानगर प्राधिकरणाची बैठक निदान तीन महिन्यांतून एकदा सभापती ठरवील अशा ठिकाणी व अशा वेळी घेण्यात येईल आणि पोट-कलम (३) च्या तरतुदींना अधीन राहून, अशा (बैठकीतील गणपूर्ती धरून) कामकाज चालवण्याच्या बाबतीत विनियमांद्वारे घालून देण्यात येतील अशा कार्यपद्धतीविषयक नियमांचे पालन करण्यात येईल.

[१][ (२) सभापती हा प्राधिकरणाच्या बैठकींच्या अध्यक्षपदी असेल. कोणत्याही बैठकीस सभापती अनुपस्थित असेल त्यावेळी त्या बैठकीत उपस्थित असणाऱ्या सदस्यांनी निवडून दिलेला प्राधिकरणाचा इतर कोणताही सदस्य अशा बैठकीचे अध्यक्षस्थान स्वीकारील. ]

(३) प्राधिकरणाद्वारे किंवा त्याच्या वतीने केलेल्या किंवा करावयाचे योजिलेल्या कोणत्याही संविदेत, त्याच्या कर्ज व्यवस्थेत किंवा प्रस्तावात, प्रत्यक्षतः किंवा अप्रत्यक्षतः कोणताही आर्थिक हिस्सा किंवा इतर हितसंबंध असणारा किंवा संपादन करणारा प्राधिकरणाचा सदस्य हा प्राधिकरणाचा सदस्य असण्याचे बंद होईल :

परंतु, एखादा सदस्य हा, अशी कोणतीही संविदा, कर्ज व्यवस्था किंवा प्रस्ताव यांमध्ये संबंधित सार्वजनिक मर्यादित कंपनीचा भागधारक आहे किंवा प्राधिकरणाकडून किंवा त्याच्या वतीने तो स्वतः किंवा त्याचा कोणताही नातेवाईक नोकरीस लावण्यात आला आहे किंवा प्राधिकरणाच्या सदस्याच्या नात्याने त्याच्याकडे असा हिस्सा आहे किंवा त्याचा हितसंबंध आहे किंवा त्याची मालमत्ता किंवा जिच्यात त्याचा हिस्सा किंवा हितसंबंध आहे अशी कोणतीही मालमत्ता प्राधिकरणाकडून किंवा त्याच्या वतीने कराराद्वारे किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यानुसार संपादन करण्यात आली आहे किंवा पट्ट्यावर घेण्यात आली आहे किंवा येत आहे, याच केवळ कारणावरून अशा सदस्याचा असा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असल्याचे मानण्यात येणार नाही.

(४) प्राधिकरणाचा सदस्य हा लगतपूर्ववर्ती पोट-कलमात उल्लेख केलेल्या निरर्हतेस पात्र झाला आहे किंवा नाही यासंबंधी कोणताही प्रश्न उद्‌भवला तर तो प्रश्न राज्य शासनाच्या निर्णयासाठी निर्दिष्ट केला जाईल आणि त्यावरील त्याचा निर्णय अंतिम असेल.

६. [ स्थायी समितीची घटना व तिचे अधिकार ] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० च्या कलम ४ अन्वये हे कलम वगळण्यात आले.

**कार्यकारी समितीची घटना व तिचे अधिकार.**

[२][ ७. (१) प्राधिकरणाची, पुढील सदस्य मिळून बनलेली एक कार्यकारी समिती असेल :—

(एक) शासनाचे मुख्य सचिव ;

(दोन) महानगर आयुक्त ;

(तीन) शासनाचे सचिव, नगरविकास विभाग ;

(चार) शासनाचे सचिव, गृहनिर्माण विभाग ;

[१] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० च्या कलम ३ द्वारे पोट-कलम (२) बदलीदाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

(पाच) महानगरपालिका आयुक्त, मुंबई महानगरपालिका ;

(सहा) व्यवस्थापन संचालक, महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ ;

(सात), (आठ) आणि (नऊ) राज्य शासनाने नेमावयाचे, नागरी नियोजन व विकास क्षेत्रातील तज्ज्ञ, असे तीन सदस्य.

(२) मुख्य सचिव हा कार्यकारी समितीचा सभापती असेल. तो कार्यकारी समितीचा सचिव म्हणून एका योग्य व्यक्तीची नेमणूक करील.

(३) कार्यकारी समिती पुढील अधिकारांचा वापर करील आणि पुढील कर्तव्यांचे पालन करील :—

(एक) कर्मचारीवर्गाची नेमणूक ;

(दोन) प्राधिकरणाच्या प्रकल्पांचे व परियोजनांचे नियोजन आणि अंमलबजावणी, अशा प्रकल्पांना व परियोजनांना मान्यता देणे किंवा त्या नाकारणे, यासह ;

(तीन) प्राधिकरणाच्या प्रकल्पांसाठी व परियोजनांसाठी निविदा स्वीकारणे किंवा नाकारणे ;

(चार) कलम १३, पोट-कलम (३) अन्वये, प्राधिकरणाच्या वतीने परवानगी देणे किंवा नाकारणे ;

(पाच) मुंबई महानगर प्रदेश विकास निधीच्या जादा पैशांची गुंतवणूक करणे ;

(सहा) प्राधिकरणाच्या वतीने, कोणतीही कायदेविषयक कार्यवाही दाखल करणे, चालविणे व मागे घेणे.

(४) कार्यकारी समिती, तिचा सभापती ठरवील अशा ठिकाणी व अशा वेळी बैठक घेईल आणि समिती ठरवील अशा कार्यपद्धतीविषयक नियमांचे पालन करील.

**प्राधिकरण [३][आणि कार्यकारी समिती] यांचे आदेश, इत्यादींचे अधिप्रमाणन.**

[१][**७-क.** प्राधिकरण [२][ * * * ] आणि कार्यकारी समिती यांच्या सर्व कार्यवाह्या या यथास्थिति, प्राधिकरण [२][ * * * ] किंवा कार्यकारी समिती यांच्या सभापतीच्या किंवा सभापतीने त्या बाबतीत प्राधिकृत केलेल्या त्याच्या कोणत्याही सदस्याच्या सहीने अधिप्रमाणित करण्यात येतील आणि प्राधिकरणाचे इतर सर्व आदेश आणि लेख हे महानगर आयुक्त किंवा वित्तीय सल्लागार किंवा त्याबाबतीत महानगर आयुक्ताने प्राधिकृत केलेला प्राधिकरणाचा इतर कोणताही अधिकारी यांच्याकडून अधिप्रमाणित करण्यात येतील. ]

**८.** [ कार्यकारी मंडळांची घटना व त्याचे अधिकार ]

सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० च्या कलम ७ अन्वये हे कलम वगळण्यात आले.

**[६][* * *] समित्यांची घटना.**

**९.** (१) महानगर प्राधिकरणास, संपूर्णतः प्राधिकरणाचेच सदस्य असणाऱ्या किंवा अंशतः अशा प्राधिकरणाचे काही सदस्य आणि इतर काही व्यक्ती मिळून होणाऱ्या [४][ * * * ] समित्यांची त्यास योग्य वाटेल अशा प्रयोजनासाठी किंवा प्रयोजनांसाठी घटना करता येईल. महानगर प्राधिकरण विनियमांद्वारे विनिर्दिष्ट करील असे अधिकार अशा कोणत्याही [५][ * * * ] समितीकडे सोपविता येतील.

---

[१] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ च्या कलम ५ द्वारे कलम ७-क समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० च्या कलम ६ (अ) द्वारे " स्थायी समिती " हे शब्द वगळण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ६ (ब) द्वारे " स्थायी आणि कार्यकारी समिती " या शब्दांऐवजी हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ च्या कलम ७ (अ) द्वारे " इतर मंडळांची किंवा " हे शब्द वगळण्यात आले.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ७ (अ) द्वारे " मंडळाकडे किंवा " हे शब्द वगळण्यात आले.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ७ (ड) द्वारे " इतर मंडळे किंवा " हे शब्द वगळण्यात आले.

(२) या कलमान्वये घटना करण्यात आलेल्या [१] * * * समित्या या, विनियमाद्वारे तरतूद करण्यात येतील अशा ठिकाणी व अशा वेळी बैठकी घेतील व आपल्या बैठकींचे कामकाज चालविण्यासंबंधात विहित करण्यात येईल अशा कार्यपद्धतीच्या नियमांचे पालन करतील.

(३) [२] * * * समित्यांच्या सदस्यांना बैठकींना उपस्थित राहण्यासंबंधातील वैयक्तिक खर्च भागविण्यासाठी व [२] * * * समित्यांच्या इतर कोणत्याही कामासाठी विनियमांद्वारे तरतूद करण्यात येतील असे भत्ते देता येतील.

**१०.** (१) त्या त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, प्राधिकरणाचा किंवा त्यांच्या कोणत्याही समितीचा किंवा मंडळाचा सदस्य (सभापती किंवा उप सभापती यांसह) हा, त्या प्राधिकरणाचा किंवा त्याच्या समित्यांचा किंवा मंडळाचा सदस्य आहे याच केवळ कारणावरून राज्य विधानमंडळाचा किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाचा किंवा अशा विधानमंडळाच्या किंवा प्राधिकरणाच्या कोणत्याही समितीचा, मंडळाचा किंवा संस्थेचा सदस्य किंवा परिषद सदस्य म्हणून निवडला जाण्यास आणि असा सदस्य किंवा परिषद सदस्य असण्यास निरर्ह असणार नाही. **सदस्य हे, राज्य विधानमंडळाचे किंवा स्थानिक प्राधिकरणाचे सदस्य म्हणून निवडणूक लढविण्यास किंवा सदस्य असण्याचे चालू राहण्यास निरर्ह न ठरणे.**

१९५६ चा मुंबई ५२. (२) मुंबई विधानमंडळ सदस्य (निरर्हता दूर करणे) अधिनियम, १९५६ यांच्या अनुसूची एक मधील नोंद १५ नंतर पुढील नोंदीची भर घालण्यात येईल :—

१९७५ चा महा. ४. "१६. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ अन्वये, घटित करण्यात आलेल्या प्राधिकरणाच्या किंवा त्या अधिनियमान्वये घटित करण्यात आलेल्या त्याच्या कोणत्याही समित्यांच्या किंवा मंडळाच्या सदस्यांचे (सभापती किंवा उप सभापती यांसह) अधिकारपद."

[३] [**१०-क.** प्राधिकरणास, [४] [किंवा कार्यकारी समितीस] कोणत्याही गोष्टीबाबत किंवा गोष्टींबाबत सहाय्य करण्यासाठी किंवा त्यावर सल्ला देण्यासाठी विशेष किंवा स्थायी निमंत्रित म्हणून आपल्या बैठकीला किंवा बैठकींना हजर राहण्यासाठी शासनाच्या किंवा स्थानिक प्रधिकरणाच्या कोणत्याही अधिकाऱ्यास बोलविता येईल, अशा प्रकारे निमंत्रित अधिकाऱ्यास कार्यवाहीमध्ये भाग घेता येईल, परंतु त्याला मतदानाचा अधिकार असणार नाही.] **सहाय्य किंवा सल्ला देण्यासाठी शासनाच्या आणि स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना बोलविण्याची तरतूद.**

---

[१] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ च्या कलम ७ ब द्वारे " मंडळे " हा शब्द वगळण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ७ (क) द्वारे " मंडळाच्या व " आणि " मंडळाच्या किंवा " हे शब्द वगळण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ८ द्वारे कलम १० क समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० च्या कलम ८ द्वारे " स्थायी समितीस, कार्यकारी समितीस किंवा खाद्य कार्य मंडळास " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

## प्रकरण तीन

### अधिकारी व कर्मचारी

प्राधिकरणाचे अधिकारी व कर्मचारी.

**११.** (१) राज्य शासन, महानगर आयुक्ताची नेमणूक करील. राज्य शासन, आदेशाद्वारे महानगर आयुक्ताचे वेतन व त्याच्या सेवेच्या इतर अटी व शर्ती, वेळोवेळी, ठरवील. राज्य शासन ठरवील त्याप्रमाणे, जास्तीत जास्त ३ वर्षांपर्यंत असेल अशा कालावधीसाठी त्याची नेमणूक करण्यात येईल व त्याच्या नेमणुकीचा कालावधी एकावेळी, तीन वर्षांपेक्षा अधिक नसेल अशा कालावधीसाठी, वेळोवेळी, वाढविता येईल :

परंतु, राज्य शासनास, कोणत्याही वेळी,

(क) महानगर आयुक्ताचा राज्य सेवेत धारणाधिकार असेल तर, प्राधिकरणाशी विचारविनिमय केल्यानंतर अशा सेवेत परत बोलविता येईल ;

(ख) आपल्या अधिकार पदाची कर्तव्ये पार पाडण्यास तो असमर्थ आहे किंवा जीमुळे त्यास दूर करणे इष्ट होईल अशा कोणत्याही गैरवर्तणुकीबद्दल किंवा हयगयीबद्दल तो दोषी आहे असे राज्य शासनास दिसून आल्यास त्यास अधिकार पदावरून दूर करता येईल :

परंतु आणखी असे की, महानगर आयुक्ताचा राज्याच्या सेवेत धारणाधिकार असेल तर, त्यास परत बोलविण्यासंबंधीचा ठराव संमत करून प्राधिकरणाने तशी विनंती केली असेल तर, त्यास अशा सेवेत तावडतोब परत बोलाविता येईल :

परंतु तसेच, महानगर आयुक्तास, प्राधिकरणाच्या सभापतीकडे लेखी पत्राद्वारे आपल्या अधिकार पदाचा राजीनामा देता येईल, परंतु प्राधिकरणाच्या सभापतीने असा राजीनामा स्वीकारल्यावरच तो अमलात येईल.

[१][ (१क) (क) लेखांकन, वित्तविषयक आणि आर्थिक विषयात अर्हताप्राप्त आणि अनुभवी अशा व्यक्तीची, राज्य शासन वित्तीय सल्लागार म्हणून नेमणूक करील.

वित्तीय सल्लागाराचे वेतन आणि त्याच्या सेवेच्या इतर अटी व शर्ती राज्य शासन वेळोवेळी आदेशाद्वारे ठरवील.

(ख) वित्तीय सल्लागार हा प्राधिकरणाच्या वित्त, अर्थसंकल्प, लेखा आणि लेखापरीक्षा या विभागांचा प्रमुख असेल. त्यास [२][ प्राधिकरणाच्या किंवा कार्यकारी समितीच्या ] कोणत्याही बैठकीला उपस्थित राहण्याचा आणि त्यातील कोणत्याही लेखाविषयक, वित्तविषयक किंवा आर्थिक गोष्टीबाबत सल्ला देण्याचा अधिकार असेल, परंतु या पोट-कलमाच्या आधारे त्याला मत देण्याचा हक्क असणार नाही. तो पुढील गोष्टींस जबाबदार असेल :—

(एक) प्राधिकरणाचे सर्व अर्थसंकल्प, पुरवणी अर्थसंकल्प याविषयीची आणि वित्तीय व्यवस्थापनविषयक माहिती तयार करणे ;

(दोन) प्राधिकरणाची लेखांकनाची कामे करणे ;

(तीन) अंतर्गत लेखापरीक्षा ;

(चार) प्रकल्प आणि परियोजना यांचे वित्तीय मूल्यन ;

(पाच) प्राधिकरणाच्या, आणि त्याने वित्त व्यवस्था केलेले प्रकल्प आणि परियोजना यांच्या वित्तीय कार्याचे संनियंत्रण ;

---

[१] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ च्या कलम ९ अ द्वारे पोट-कलमे (१क) व (१ख) समाविष्ट करण्यात आली.

[२] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० च्या कलम ९ अ (एक) द्वारे " प्राधिकरणाच्या, स्थायी समितीच्या किंवा कार्यकारी समितीच्या " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

(सहा) कार्यकारी समितीच्या [1][ * * * * ] विचारार्थ, वरील बाबींच्या आणि प्रदाने व इतर वित्तीय व्यवहार याच्या संबंधीचे कार्यपद्धतीविषयक विनियम आणि अनुदेश याचे मसुदे तयार करणे ;

(सात) प्राधिकरणाने त्याच्याकडे वेळोवेळी सोपविलेली इतर कोणतीही बाब.

(१ख) राज्य शासनास, [2][ कार्यकारी समितीने ] तशी विनंती केल्यानंतर, एक किंवा अधिक अपर, उप किंवा सहायक महानगर आयुक्तांची नेमणूक करता येईल. राज्य शासन, आदेशाद्वारे वेळोवेळी अपर महानगर आयुक्त, उप महानगर आयुक्त आणि सहायक महानगर आयुक्त यांचे वेतन आणि त्यांच्या सेवेच्या इतर अटी व शर्ती ठरवील.]

(२) प्राधिकरणास, [3][त्यास आवश्यक वाटतील त्याप्रमाणे प्राधिकरणास [4][ * * * * ] दुय्यम असतील अशा अन्य अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची पदे निर्माण करण्यास मंजुरी देता येईल.] अशा कर्मचाऱ्यांच्या नेमणुकीच्या व सेवेच्या अटी आणि त्यांचे अधिकार व कर्तव्ये ही विनियमांद्वारे ठरविण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

---

## प्रकरण चार

## प्राधिकरणाचे अधिकार व कार्ये

**महानगर प्राधिकरणाची कार्ये.**

**१२.** [5][(१) प्रादेशिक योजनेनुसार मुंबई महानगर प्रदेशाचा विकास साधणे हा या प्राधिकरणाचा मुख्य उद्देश असेल व त्या प्रयोजनासाठी प्राधिकरणाची कामे पुढीलप्रमाणे असतील :—

(क) कोणत्याही भौतिक, वित्तीय व आर्थिक परियोजनेचा आढावा घेणे ;

(ख) महानगर प्रदेशात प्रस्तावित करण्यात येईल किंवा जो अमलात आणण्याच्या ओघात असेल किंवा जो पूर्ण करण्यात आला असेल अशा कोणत्याही विकास प्रकल्पाचा किंवा परियोजनेचा आढावा घेणे;

(ग) महानगर प्रदेशाच्या किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या विकासाच्या परियोजना तयार करणे व त्या मंजूर करणे ;

(घ) [6][* * * *] प्रकल्प व परियोजना अमलात आणणे ;

(ङ) महानगर प्रदेशाच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासनाकडून किंवा अन्य कोणत्याही प्राधिकरणाकडून कार्यवाही केली जाणे जिच्या बाबतीत आवश्यक असेल अशी कोणतीही बाब किंवा प्रस्ताव यांची राज्य शासनाकडे शिफारस करणे;

(च) आंतरप्रदेश विकासासाठी अन्य कोणत्याही प्राधिकरणाबरोबर सहभागी होणे ;

(छ) महानगर प्रदेशाच्या विकासाच्या कोणत्याही प्रकल्पासाठी किंवा परियोजनेसाठी वित्त व्यवस्था करणे ;

(ज) महानगर प्रदेशाच्या विकासाचे प्रकल्प किंवा परियोजना यांच्या अंमलबजावणीत समन्वय राखणे ;

---

[1] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० च्या कलम ९ (अ)(दोन) द्वारे " आणि स्थायी समितीच्या " हे शब्द वगळण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ९ (ब) द्वारे " स्थायी समितीने " या शब्दांऐवजी हे शब्द बदलीदाखल करण्यात आले.

[3] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ च्या कलम ९ (ब) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० च्या कलम ९ (क) द्वारे कंस आणि ' (कोणत्याही कार्यकारी मंडळास) ' हे शब्द वगळण्यात आले.

[5] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ च्या कलम १० द्वारे मूळ पोट-कलमाऐवजी पोट-कलम (१) समाविष्ट करण्यात आले.

[6] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० च्या कलम १० द्वारे " राज्य शासनाच्या निदेशानुसार " हे शब्द वगळण्यात आले.

(झ) ज्या प्रकल्पांचा किंवा परियोजनांचा खर्च, पूर्णपणे किंवा अंशतः मुंबई महानगर प्रदेश विकास निधीमधून भागवावयाचा असेल अशा कोणत्याही प्रकल्पाच्या किंवा परियोजनेच्या नियोजनाचे व त्याच्या अंमलबजावणीचे पर्यवेक्षण करणे किंवा पुरेसे पर्यवेक्षण ठेवण्यात येत असल्याची निश्चिती करणे;

(ञ) परियोजना तयार करणे, व कृषि, फलोत्पादन, पुष्पसंवर्धन, वनशास्त्र, दुग्धव्यवसाय विकास, कुक्कुटपालन, सूकरालय, पशुपैदास, मत्स्यव्यवसाय व इतर तत्सम कार्ये यांच्या विकासाकरिता परियोजना तयार करणे व अशा परियोजना तयार करण्याच्या व हाती घेण्याच्या बाबतीत संबंधित प्राधिकरणांना सल्ला देणे;

(ट) प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या व्यक्तींचे पुनर्वसन करण्यासाठी व त्यांच्याकरिता पर्यायी जागांची सोय करण्यासाठी असलेल्या परियोजना आणि अशा आवश्यकतांसाठी तरतूद असलेल्या परियोजना तयार करणे व त्यांची अंमलबजावणी करणे;

(ठ) प्राधिकरणाच्या कार्यामुळे उद्‌भवणाऱ्या व ज्यासाठी प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली त्या उद्दिष्टांच्या पुरःसरणासाठी आवश्यक असणाऱ्या अशा कोणत्याही बाबींशी आनुषंगिक किंवा पोषक अशी सर्व आवश्यक कार्ये व गोष्टी करणे.]

(२) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ किंवा त्या त्या वेळी अमलात असलेला इतर कोणताही कायदा यात काहीही अंतर्भूत असले तरी, प्राधिकरणास, महानगर प्रदेशासाठी किंवा त्याच्या कोणत्याही भागासाठी, उक्त अधिनियमान्वये तयार करण्यात आलेल्या प्रादेशिक योजनेच्या पुनर्विलोकनाचे काम कोणत्याही वेळी हाती घेता येईल व या प्रयोजनार्थ त्यास, त्या अधिनियमाच्या कलम ४ अन्वये रचना करण्यात आलेल्या प्रादेशिक नियोजन मंडळाचे सर्व अधिकार असतील आणि त्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार असे पुनर्विलोकन करता येईल. १९६६ चा महा. ३७.

(३) संबंधित नियोजन प्राधिकरणाशी विचारविनिमय करून, प्राधिकरणास महानगर प्रदेशाच्या एकात्मीकृत विकासाच्या प्रयोजनासाठी, त्या नियोजन प्राधिकरणाच्या क्षेत्रासाठी उपरोक्त अधिनियमाखालील विकास योजनांत फेरबदल किंवा त्यांचे पुनर्विलोकन करण्याचे काम हाती घेता येईल व या प्रयोजनार्थ त्यास त्या अधिनियमाखालील नियोजन प्राधिकरणाचे सर्व अधिकार असतील.

**इतर कोणत्याही प्राधिकरणाने किंवा व्यक्तीने परवानगीशिवाय विवक्षित विकासाचे काम हाती न घेणे.**

**१३.** (१) त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी प्राधिकरणाच्या पूर्वपरवानगीशिवाय इतर कोणतेही प्राधिकरण किंवा व्यक्ती, महानगर प्राधिकरण राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी विनिर्दिष्ट करील असे, ज्यामुळे महानगर प्रदेशाच्या [1][सर्वांगीण विकासावर] प्रतिकूल परिणाम होण्याचा संभव आहे अशा कोणत्याही प्रकारचे विकासाचे काम महानगर प्रदेशात हाती घेणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेले विकासाचे काम हाती घेण्याची इच्छा असणारे कोणतेही प्राधिकरण किंवा व्यक्ती असे विकासाचे काम हाती घेण्याच्या परवानगीसाठी महानगर प्राधिकरणाकडे लेखी अर्ज करील.

(३) महानगर प्राधिकरण, त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर व पोट-कलम (२) खालील अर्ज मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत, कोणत्याही शर्तीशिवाय किंवा त्यास लादणे योग्य वाटतील अशा शर्तींसह, अशी परवानगी देईल किंवा अशी परवानगी देण्याचे नाकारील. उपरोक्तप्रमाणे अशी परवानगी ६० दिवसांच्या आत नाकारण्यात आली नाही तर, महानगर प्राधिकरणाने अशी परवानगी दिली असल्याचे मानण्यात येईल.

(४) पोट-कलम (३) खालील महानगर प्राधिकरणाच्या निर्णयामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही प्राधिकरणास किंवा व्यक्तीस, ३० दिवसांच्या आत, अशा निर्णयाविरुद्ध राज्य शासनाकडे अपील करता येईल व राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल :

[1] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ च्या कलम ११ अन्वये " एकात्मीकृत विकासावर " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[१][ परंतु असे अपील सादर करणारे, व्यथित झालेले कोणतेही प्राधिकरण, केंद्र सरकारच्या प्रशासनिक नियंत्रणाखाली असेल त्याबाबतीत, केंद्र सरकारशी विचारविनिमय केल्यानंतर, राज्य शासनाकडून अपिलाचा निर्णय करण्यात येईल. ]

(५) कोणतीही व्यक्ती किंवा कोणतेही प्राधिकरण [२][ पोट-कलम (३) अन्वये लादलेल्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करील किंवा ] पोट-कलम (४) अन्वये दिलेल्या निर्णयाविरुद्ध कोणतीही गोष्ट करील त्या बाबतीत, प्राधिकरणास, अशा निर्णयाविरुद्ध असलेले, हाती घेतलेले कोणतेही विकासविषयक काम थांबविण्याचा, ते पाडून टाकण्याचा किंवा काढून टाकण्याचा आणि संबंधित व्यक्ती किंवा प्राधिकरण यांच्याकडून असे थांबविणे, ते पाडून किंवा काढून टाकणे यासंबंधातील खर्च वसूल करण्याचा अधिकार असेल.

**महानगर प्राधिकरणाचा निदेश देण्याचा अधिकार.**

**१४.** (१) त्या त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी [३][महानगर प्राधिकरणास, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे कलम १२ अन्वये ज्यासाठी वित्त व्यवस्था करण्यात आली आहे अशा कोणत्याही विकास प्रकल्पाच्या किंवा परियोजनेच्या कार्यान्वयना-संबंधात [४][कोणत्याही स्थानिक प्राधिकरणास किंवा इतर प्राधिकरणास किंवा व्यक्तीस] निदेश देता येतील] व अशा निदेशांचे पालन करणे [५][अशा इतर प्राधिकरणावर किंवा व्यक्तीवर] बंधनकारक असेल.

(२) पोट-कलम (१) अन्वये एखाद्या प्राधिकरणास [६][किंवा व्यक्तीस] कोणताही निदेश देण्यात आला असेल त्या बाबतीत, अशा प्राधिकरणास [६][किंवा व्यक्तीस] असा निदेश मिळाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत अशा निदेशाविरुद्ध, राज्य शासनाकडे अपील करता येईल व राज्य शासनाचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

(३) महानगर प्राधिकरण, प्रत्येक विकास प्रकल्प किंवा परियोजना ही, मुंबई महानगर प्रदेशाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने आणि त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये किंवा राज्य शासनाने, यथोचितरीत्या मान्यता दिलेली कोणतीही योजना, प्रकल्प किंवा परियोजना यानुसार पार पाडण्यात आली आहे हे सुनिश्चित करण्यासाठी, आवश्यक असेल अशा रीतीने कलम १२, पोट-कलम (१), [७][खंड (एक)] यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पर्यवेक्षणविषयक अधिकारांचा वापर करील.

---

[१] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ च्या कलम ५ द्वारे हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० च्या कलम ११ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५९ च्या कलम ५ द्वारे " महानगर प्राधिकरणास " या शब्दांनी सुरू होणाऱ्या आणि " निदेश देता येतील " या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ च्या कलम १२ (अ) (एक) द्वारे " कोणत्याही प्राधिकरणास " या शब्दांऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम १२ (अ) (दोन) द्वारे " अशा इतर प्राधिकरणावर " या शब्दांऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम १२ (ब) द्वारे हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[७] वरील अधिनियमाच्या कलम १२ (क) द्वारे " खंड (क) " या शब्दाऐवजी हा शब्द व कंस दाखल करण्यात आला.

**विवक्षित प्रकरणांमध्ये स्थानिक प्राधिकरणास जबाबदारी घेण्यास फर्माविण्याचा महानगर प्राधिकरणाचा अधिकार.**

**१५.** महानगर प्राधिकरणाद्वारे कोणत्याही सुखसोयी पुरविण्यात आल्या असतील त्या बाबतीत प्राधिकरणास, त्यांच्याकडून पुरविण्यात आलेल्या सुखसोयींच्या परिरक्षणाची जबाबदारी स्वतःकडे घेता येईल किंवा महानगर प्राधिकरण आणि स्थानिक प्राधिकरण यांमध्ये कबूल करण्यात येतील अशा अटींवर व शर्तींवर, आणि अशा अटी व शर्ती कबूल केल्या जात नसतील त्या बाबतीत स्थानिक प्राधिकरण व महानगर प्राधिकरण यांच्याशी विचारविनिमय करून राज्य शासनाकडून विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अटींवर व शर्तींवर, असे विकसित क्षेत्र ज्याच्या स्थानिक हद्दीत येत असेल अशा स्थानिक प्राधिकरणास या सुखसोयींच्या परिरक्षणाची आणि महानगर प्राधिकरणाने न पुरविलेल्या, परंतु त्यांच्या मते त्या क्षेत्रात पुरविणे आवश्यक असलेल्या इतर सुखसोयी पुरविण्याची जबाबदारी घेण्यास फर्माविता येईल.

**कोणत्याही योजनेची अंमलबजावणी करण्याचा महानगर प्राधिकरणाचा अधिकार.**

**१६.** (१) महानगर प्राधिकरणाने कलम १४, पोट-कलम (१) अन्वये, कोणत्याही विकास प्रकल्पाबाबत किंवा परियोजनेबाबत दिलेल्या कोणत्याही अनुदेशाचे त्यात निर्देश केलेल्या प्राधिकरणाकडून अनुदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत पालन करण्यात आले नाही किंवा प्रदेशाच्या कोणत्याही भागासाठी, विकासासाठी त्याने हाती घेतलेल्या कोणत्याही प्रकल्पाची किंवा परियोजनेची पूर्णपणे अंमलबजावणी करण्यास असे प्राधिकरण असमर्थ आहे याबद्दल महानगर प्राधिकरणाची खात्री होईल त्या बाबतीत, त्याला राज्य शासनाच्या मंजुरीने, अशा विकास प्रकल्पांच्या किंवा, यथास्थिति, अशा परियोजनांच्या अंमलबजावणीसाठी, कोणतीही कामे हाती घेता येतील आणि कोणताही खर्च करता येईल आणि संबंधित प्राधिकरणाकडून त्याचा खर्च वसूल करता येईल.

(२) महानगर प्राधिकरणास, राज्य शासनाकडून निदेशित करण्यात येईल त्याप्रमाणे [१][प्रादेशिक योजनेनुसार विकासाचे कोणतेही काम प्रदेशात हाती घेता येईल] आणि अशा कामाच्या कार्यान्वयासाठी आवश्यक असेल असा खर्च करता येईल. [२][(क) असे काम हाती घेण्यास योग्य असे दुसरे कोणतेही प्राधिकरण नाही किंवा (ख) तसे प्राधिकरण आहे परंतु, ते असे काम करण्यास इच्छुक किंवा समर्थ नाही किंवा (ग) महानगर प्राधिकरणाने असे काम आपणाकडे सोपवावे अशी राज्य शासनाला विनिर्देशपूर्वक विनंती केली आहे असे राज्य शासनाचे मत असेल, केवळ त्याच बाबतीत प्राधिकरणास असे निदेश देता येतील.]

(३) पोट-कलम (१) अन्वये महानगर प्राधिकरणाने कोणतेही काम हाती घेतले असेल त्या बाबतीत, त्याला असे काम पार पाडण्याच्या प्रयोजनांसाठी पोट-कलम (१) मध्ये निर्देश केलेल्या प्राधिकरणाला, त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा कायद्याअन्वये ज्या अधिकाराचा वापर करता येईल, ते सर्व अधिकार असल्याचे मानण्यात येईल.

(४) महानगर प्राधिकरणास, पोट-कलम (१) आणि (२) यांच्या प्रयोजनासाठी महानगर प्रदेशातील कोणत्याही क्षेत्राचे सर्वेक्षण करता येईल आणि त्या प्रयोजनासाठी, महानगर प्राधिकरणाच्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने,—

(क) कोणत्याही जमिनीत किंवा जमिनीवर प्रवेश करणे आणि अशा जमिनीची पातळी घेणे;

(ख) अवमृदा (Sub-Soil) खणणे किंवा विंधणे;

---

[१] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ च्या कलम १३ (अ) द्वारे हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १३ (ब) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(ग) चिन्हांकन करून व चर खणून पातळयांच्या आणि हद्दींच्या खुणा करणे;

(घ) अन्यथा सर्वेक्षण पूर्ण करता येत नसेल व पातळ्या घेता येत नसतील व हद्दींच्या खुणा करता येत नसतील त्याबाबतीत, कोणतेही कुंपण किंवा झाडेझुडपे कापणे व स्वच्छ करणे कायदेशीर असेल :

परंतु, कोणत्याही जमिनीत प्रवेश करण्यापूर्वी, महानगर प्राधिकरण, तसे करण्याच्या आपल्या हेतुबद्दल, विनियमांत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने नोटीस देईल.

**विवक्षित कंपन्यांच्या किंवा सहकारी संस्थांच्या भाग-भांडवलास अभिदान देण्याचा अधिकार महानगर प्राधिकरणाला असणे.**

[१][**१६-क.** राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने आणि राज्य शासनास लादता येतील अशा अटींना व शर्तींना अधीन राहून, महानगर प्राधिकरणास, हा अधिनियम किंवा त्या त्या वेळी अमलात असलेला इतर कोणताही कायदा याद्वारे किंवा तदन्वये त्यावर लादलेली त्याची कोणतीही कर्तव्ये पार पाडण्याच्या बाबतीत, प्राधिकरणास प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे उपयुक्त असलेल्या, महानगर क्षेत्रात किंवा त्याच्या कोणत्याही भागात सेवांची तरतूद करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या किंवा स्थापन करण्यात यावयाच्या, मर्यादित दायित्वाच्या कोणत्याही कंपनीच्या किंवा सहकारी संस्थेच्या भाग भांडवलास, अभिदान देता येईल.]

**प्रदेशाच्या एकात्मीकृत विकासाच्या प्रयोजना-व्यतिरिक्त, मुंबई महानगर-पालिकेच्या आवश्यक आणि स्वेच्छाधीन कर्तव्यांमध्ये मोडणाऱ्या बाबींसाठी प्राधिकरण सर्वसाधारणपणे तरतूद करणार नाही.**

१८८८ चा मुंबई ३.

**१७.** या प्रकरणात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही मजकुरामुळे, मुंबई महानगर प्रदेशाच्या एकात्मीकृत विकासाच्या प्रयोजनासाठी कोणत्याही बाबींसाठी प्राधिकरणाने तरतूद करणे आवश्यक असेल त्याव्यतिरिक्त, बृहन्मुंबई महानगरपालिकेने मुंबई महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६१ आणि ६३ अन्वये अशा ज्या बाबींसाठी तरतूद केली असेल किंवा तिच्याकडून तरतूद करण्यात यावयाची असेल त्या बाबींपैकी कोणत्याही बाबींसाठी, बृहन्मुंबईत तरतूद करण्यासाठी प्राधिकरणास अधिकार मिळणार नाही. या कलमान्वये प्राधिकरणास एखाद्या बाबीच्या संबंधात तरतूद करता येणे शक्य आहे किंवा नाही याबद्दल कोणतीही शंका किंवा विवाद असेल त्याबाबतीत असा प्रश्न राज्य शासनाच्या निर्णयासाठी निर्दिष्ट करण्यात येईल व राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल.

---

[१] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ च्या कलम १४ द्वारे कलम १६-क समाविष्ट करण्यात आले.

## प्रकरण पाच

## वित्त व्यवस्था, अर्थसंकल्प आणि लेखे

महानगर प्राधिकरणाचे निधी. १८. (१) महाराष्ट्र प्राधिकरणासाठी, " मुंबई महानगर प्रदेश विकास निधी " या नावाने संबोधण्यात येणारा एक निधी असेल. त्या निधीच्या खाती, पुढील बाबी धरून प्राधिकरणास मिळालेल्या सर्व रकमा जमा करण्यात येतील---

(क) [१] * * * *

(ख) प्राधिकरणाने स्थापन करावयाच्या फिरत्या निधीमध्ये, राज्य योजनेमध्ये अंतर्भूत केलेल्या परियोजनेनुसार राज्य शासन निर्धारित करील अशा हप्त्यांमध्ये आणि याबाबतीत रीतसर केलेल्या विनियोजनाद्वारे, दहा कोटी रुपयांपेक्षा कमी नसेल एवढ्या रकमेचे राज्य शासनाने केलेले अंशदान; प्राधिकरण या अंशदानाचा राज्य शासन वेळोवेळी मान्यता देईल अशा योजनांतर्गत विकास कार्यासाठी वापर करील;

(ग) राज्य शासनाकडून प्राधिकरणास देण्यात येतील अशा इतर रकमा;

(घ) संघ राज्य सरकार किंवा कोणतेही इतर प्राधिकरण किंवा अभिकरण यांच्याकडून देण्यात येतील अशा रकमा;

(ङ) प्रकरण सहा अन्वये बसविलेल्या कोणत्याही उपकराच्या निव्वळ उत्पन्नातून राज्य शासनाने प्राधिकरणाच्या स्वाधीन केलेल्या रकमा;

(च) प्रकरण सहा अन्वये बसविलेल्या कोणत्याही सुधार आकाराचे उत्पन्न;

(छ) या अधिनियमाखाली किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याखाली प्राधिकरणास मिळणारी सर्व फी, खर्च आणि आकार;

(ज) जमिनी, इमारती व इतर स्थावर व जंगम मालमत्ता यांच्या विनियोगापासून व इतर व्यवहारांपासून प्राधिकरणास मिळणाऱ्या सर्व रकमा;

(झ) प्राधिकरणाने कर्जाऊ घेतलेला सर्व पैसा;

(ञ) भाडे आणि नफा या स्वरूपात किंवा इतर कोणत्याही रीतीने किंवा इतर कोणत्याही साधनापासून प्राधिकरणास मिळणारा सर्व पैसा.

(२) महानगर प्राधिकरणास, भारतीय स्टेट बँकेकडे किंवा बँक व्यवसाय नियमन अधिनियम, १९४९ याच्या कलम २२ अन्वये रिझर्व बँकेने दिलेले लायसन धारण करणाऱ्या, भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४ यामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे कोणत्याही अनुसूचित बँकेकडे किंवा याबाबतीत राज्य शासनाने मान्यता दिलेल्या कोणत्याही इतर बँकेकडे चालू किंवा ठेव खात्यात, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे निधीतील पैसा ठेवता येईल आणि उक्त रकमेपेक्षा अधिक होणारा पैसा, राज्य शासन मान्यता देईल अशा रीतीने गुंतविण्यात येईल. (१९४९ चा १०. १९३४ चा २.)

(३) महानगर प्राधिकरणाकडून याबाबतीत केलेल्या विनियमाद्वारे प्राधिकृत करण्यात येईल असे त्याचे अधिकारी अशा खात्यातील पैशांचा व्यवहार करतील.

कर्ज निधी. [२][१८-क. (१) मुंबई महानगर प्रदेश विकास निधीचा एक भाग म्हणून महानगर प्राधिकरण---

(क) त्याने कर्जाऊ घेतलेल्या सर्व रकमांचा स्वीकार करण्यासाठी--यात प्राधिकरणाच्या ऋणकोंकडून मिळालेले परतफेडीचे सर्व हप्ते आणि त्याने कर्जावर दिलेले व्याज यांचा समावेश होतो; (ख) प्राधिकरणाकडून स्थानिक प्राधिकरणांना आणि इतर प्राधिकरणांना किंवा व्यक्तींना कर्जे किंवा आगाऊ रकमा म्हणून उपलब्ध करून द्यावयाच्या सर्व रकमांची तरतूद करण्यासाठी;

---

[१] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम २ द्वारे " खंड (क)" वगळण्यात आला.

[२] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ च्या कलम १५ द्वारे कलम १८-क समाविष्ट करण्यात आले.

(ग) या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी प्राधिकरणाने उभारलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी; आणि

(घ) प्रकल्प व परियोजना यांवरील खर्चासाठी एखाद्या बँकेत स्वतंत्र खाते उघडून एक कर्ज निधी स्थापन करील ;

(२) कर्ज निधींशी संबंधित सर्व बाबींचे या बाबतीत करण्यात आलेल्या विनियमांद्वारे नियमन करण्यात येईल.]

**राखीव व इतर निधी.**

१९. (१) महानगर प्राधिकरण राखीव निधीसाठी तरतूद करील आणि त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे अन्य विशेषरीत्या अभिधान दिलेल्या निधीसाठी तरतूद करता येईल.

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्देश केलेल्या निधींचे व्यवस्थापन, त्या निधीच्या खाती वेळोवेळी बदली करावयाच्या रकमा आणि त्यात असलेल्या पैशांचे उपयोजन यासंबंधीचा निर्णय महानगर प्राधिकरण घेईल.

**निधींचे उपयोजन, इत्यादी.**

२०. महानगर प्राधिकरणाकडे निहित असलेली सर्व मालमत्ता, निधी व इतर मत्ता, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी व त्याच्या तरतुदींना अधीन राहून, प्राधिकरणाकडून धारण करण्यात येईल व त्यांचे उपयोजन करण्यात येईल.

**महानगर प्राधिकरणाला पैसा कर्जाऊ घेण्याचा अधिकार.**

२१. महानगर प्राधिकरणास राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने, या अधिनियमाचे प्रयोजन पार पाडण्यासाठी किंवा त्याने घेतलेल्या कोणत्याही कर्जाच्या परतफेडीसाठी राज्य शासन, पैसे कर्जाऊ घेण्याच्या वेळी ठरवील त्या दरांनी व त्या शर्तीवर, कोणताही पैसा कर्जाऊ घेता येईल.

**महानगर प्राधिकरणास प्रकल्प व परियोजना यांसाठी वित्तव्यवस्था करण्याचा व त्यासाठी शर्ती लादण्याचा अधिकार.**

[1][२१-क. महानगर प्राधिकरण, कलम १२ च्या कोणत्याही प्रयोजनाकरिता, कोणत्याही स्थानिक प्राधिकरणास किंवा महानगर प्रदेशातील अन्य प्राधिकरणास अनुदाने, आगाऊ रकमा किंवा कर्जे देण्यास किंवा त्यांच्याबरोबर खर्च वाटून घेण्यास सक्षम असेल आणि त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी [2][परंतु मुंबई महानगरपालिका अधिनियमात अंतर्भूत असलेल्या निर्बंधास (कोणतेही असल्यास) अधीन राहून] महानगर प्राधिकरण, वेळोवेळी, अशा अन्य प्राधिकरणाशी विचारविनिमय करून, विनिर्दिष्ट करील अशा अटी व शर्तीस अधीन राहून अशा अन्य प्राधिकरणाने अशी अनुदाने, आगाऊ रकमा किंवा कर्जे किंवा खर्चातील हिस्सा स्वीकारणे कायदेशीर असेल.]

१८८८ चा मुंबई ३.

---

[1] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५९ च्या कलम ६ द्वारे कलम २१-क समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ च्या कलम १६ द्वारे हे शब्द आणि कंस समाविष्ट करण्यात आले.

प्राधिकरणाने घेतलेल्या किंवा त्याने दिलेल्या कर्जांना राज्याची हमी.

[१][२१ख. या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी राज्य शासनास लादणे योग्य वाटेल अशा शर्तीस अधीन राहून महानगर प्राधिकरणाकडून उभारण्यात किंवा देण्यात आलेल्या कोणत्याही कर्जाच्या मुद्दलाच्या परतफेडीची किंवा त्यावरील व्याजाची हमी राज्य शासनास देता येईल.] १८८८ चा मुंबई ३३.

लेखे व लेखापरीक्षा.

२२. (१) महानगर प्राधिकरण, त्याच्याकडून या बाबतीत करण्यात आलेल्या विनियमांद्वारे निश्चित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने लेखे ठेवील.

(२) महानगर प्राधिकरणाच्या लेख्यांची लेखापरीक्षा, मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा यांच्याकडून [२][किंवा राज्य शासनाने वेळोवेळी नेमलेल्या इतर कोणत्याही लेखापरीक्षकाकडून] करण्यात येईल.

(३) विनियमांद्वारे निश्चित करण्यात येईल अशा रीतीने लेखापरीक्षा करण्यात येईल.

(४) लेखापरीक्षक आपला लेखापरीक्षा अहवाल महानगर प्राधिकरणास सादर करील व त्याची एक प्रत राज्य शासनास पाठवील.

अर्थसंकल्प.

२३. (१) प्राधिकरणाचा [३][वित्त सल्लागार] दरवर्षी, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा वेळी महानगर प्राधिकरणाच्या अंदाजित जमा व संवितरित रकमा दर्शविणारा पुढील वित्तीय वर्षाबाबतचा एक वार्षिक अर्थसंकल्प तयार करील आणि तो महानगर प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी सादर करील.

(२) [३][वित्त सल्लागार] त्याने अशा रीतीने, तयार केलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजाच्या व महानगर प्राधिकरणाने मान्य केलेल्या अर्थसंकल्पाच्या प्रती राज्य शासनाकडे पाठवील.

वार्षिक अहवाल.

२४. महानगर प्राधिकरण (३१ मार्च रोजी संपणारे), प्रत्येक वर्ष संपल्यानंतर, मागील वर्षामधील आपल्या कार्याचा अहवाल तयार करील व तो ३० नोव्हेंबरपूर्वी राज्य शासनास सादर करील व राज्य शासन अशा अहवालाची एक प्रत राज्य विधानमंडळापुढे ठेवण्याची व्यवस्था करील.

प्राधिकरणाचे व्यवहार तोट्यात न चालविणे.

[४][२४-क. महानगर प्राधिकरण या अधिनियमाखालील आपले कोणतेही व्यवहार तोट्यात चालवणार नाही किंवा त्यास ते तोट्यात चालविण्यास फर्मावण्यात येणार नाही. मुंबई महानगर प्रदेश विकास निधीत कोणत्याही वित्तीय वर्षी तूट आल्यास लगतनंतरचे वित्तीय वर्ष संपण्यापूर्वी प्राधिकरणाकडून ती भरून काढण्यात येईल.]

---

१ सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ च्या कलम १७ द्वारे कलम २१-ख समाविष्ट करण्यात आले.

२ वरील अधिनियमाच्या कलम १८ द्वारे हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

३ वरील अधिनियमाच्या कलम १९ द्वारे " सचिव " या शब्दाऐवजी हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

४ वरील अधिनियमाच्या कलम २० द्वारे कलम २४-क समाविष्ट करण्यात आले.

## प्रकरण सहा

### कराधानविषयक अधिकार

इमारती व जमिनी यांवर उपकर बसवण्याचा अधिकार.

२५. (१) राज्य शासनास, महानगर प्राधिकरणाकडून विनंती करण्यात आल्यानंतर, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, मुंबई महानगर प्रदेशातील किंवा त्याच्या कोणत्याही भागातील, इमारतीवर व जमिनीवर, मालमत्तेच्या पट्टीयोग्य मूल्याच्या पाच टक्क्यांपेक्षा जास्त नसेल अशा राज्य शासन ठरवील अशा, दराने उपकर बसवता येईल :

परंतु, १ एप्रिल १९६० पूर्वी उभारण्यात आलेल्या सर्व इमारती किंवा त्यांचे भाग आणि ज्यांच्यावर त्या बांधण्यात आल्या असतील अशा जमिनी यांना उपकर देण्यापासून सूट देण्यात येईल.

(२) असा उपकर, वेगवेगळ्या क्षेत्रांसाठी आणि मालमत्तांच्या वेगवेगळ्या वर्गांसाठी वेगवेगळ्या दरांनी बसवता येईल.

(३) ज्या स्थानिक प्राधिकरणाच्या क्षेत्रात मालमत्ता असेल त्या स्थानिक प्राधिकरणाकडून, जणू काही उपकर हा, प्राधिकरणाचे नियमन करणाऱ्या कायद्यान्वये त्याने बसवलेला मालमत्ता कर असल्याप्रमाणे, वसूल करण्यात येईल आणि तो, वसुली खर्च म्हणून विहित करण्यात येईल असा त्याचा भाग वजा केल्यानंतर राज्याच्या एकत्रित निधीमध्ये प्रथम जमा करण्यात येईल.

(४) राज्य शासन, राज्य विधानमंडळाने या बाबतीत कायद्याद्वारे यथोचित विनियोजन केल्यानंतर या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी प्राधिकरणाकडून विनियोग केला जाण्यासाठी वेळोवेळी उपकराच्या उत्पन्नातून, राज्यांच्या एकत्रित निधीत जमा केलेल्या उपकराच्या निव्वळ रकमेच्या सममूल्य रकमा प्राधिकरणाला देईल.

१९४७ चा मुंबई ५७. (५) मुंबई भाडे नियंत्रण आणि हॉटेल व निवासगृह दर नियंत्रण अधिनियम, १९४७, यात काहीही अंतर्भूत असले तरी, मालकाला, महानगर प्रदेशात असलेल्या कोणत्याही जागांबाबत या कलमान्वये बसवण्यात आलेल्या उपकराचे प्रदान त्याने केल्यामुळे, उक्त जागांच्या भाड्यात कोणतीही वाढ करण्याचा हक्क राहणार नाही.

सुधार आकार बसवण्याचा महानगर प्राधिकरणाचा अधिकार.

२६. (१) कोणत्याही क्षेत्रात महानगर प्राधिकरणाने कार्यान्वित केलेल्या कोणत्याही विकास प्रकल्पाच्या किंवा परियोजनेच्या परिणामी, त्या क्षेत्रातील कोणत्याही जमिनीचे मूल्य वाढले आहे किंवा वाढण्याची शक्यता आहे असे महानगर प्राधिकरणाचे मत होईल त्या बाबतीत, महानगर प्राधिकरणास, जमिनीच्या मालकावर किंवा तीत हितसंबंध असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीवर, विकास प्रकल्प किंवा परियोजना कार्यान्वित केल्याच्या परिणामी जमिनीच्या मूल्यात झालेल्या वाढीबद्दल सुधार आकार बसवता येईल.

(२) असा सुधार आकार हा, विकास प्रकल्पाचे किंवा परियोजनेचे कार्यान्वयन पूर्ण झाल्यानंतर जमिनीवर इमारती नाहीत असे मानून केलेल्या अंदाजानुसार असलेले जमिनीचे मूल्य, अशा कार्यान्वयनाच्या लगतपूर्वीच्या, तशाच रीतीने अंदाजलेल्या, जमिनीच्या मूल्यापेक्षा जेवढ्या रकमेने वाढले असेल त्या रकमेच्या निम्म्याहून अधिक नसेल इतकी रक्कम असेल :

परंतु, कोणत्याही जमिनीवर सुधार आकार बसवताना, महानगर प्राधिकरण विकास प्रकल्पापासून किंवा परियोजनेपासून जमिनीला होणाऱ्या लाभाची व्याप्ती व स्वरूप आणि या बाबतीत केलेल्या नियमांद्वारे घालून देण्यात येतील असे इतर घटक यांचा विचार करील.

(३) शासनाची, प्राधिकरणाची किंवा इतर स्थानिक प्राधिकरणाची मालमत्ता असणाऱ्या कोणत्याही जमिनीसंबंधात शासनाकडून, प्राधिकरणाकडून किंवा इतर स्थानिक प्राधिकरणाकडून किंवा कोणत्याही सार्वजनिक संस्थेच्या मालकीच्या जमिनीबाबत, ती जमीन सार्वजनिक, धर्मादाय किंवा धार्मिक प्रयोजनार्थ वापरली जात असेल तर आणि वापरली जाईपर्यंत, सार्वजनिक संस्थेकडून कोणतेही सुधार अंशदान देय होणार नाही.

महानगर प्राधिकरणाने सुधार आकार निर्धारित करणे.

२७. (१) कोणताही विशिष्ट विकास प्रकल्प किंवा परियोजना ही, तिच्यासंबंधात सुधार आकार निश्चित करणे शक्य होईल इतकी तिची पुरेशी प्रगती झाली आहे असे महानगर प्राधिकरणास दिसून येईल तेव्हा, महानगर प्राधिकरणास या बाबतीत काढलेल्या आदेशाद्वारे, सुधार आकार निश्चित करण्याच्या प्रयोजनासाठी विकास प्रकल्पाचे किंवा परियोजनेचे कार्यान्वयन पूर्ण झाले असल्याचे मानण्यात येईल असे घोषित करता येईल आणि प्राधिकरण, त्यानंतर जमिनीच्या मालकास किंवा तीत हितसंबंध असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, महानगर प्राधिकरणाने लगतपूर्वीच्या कलमाखाली जमिनीच्या बाबतीत सुधार आकाराची रक्कम निर्धारित करण्याचे योजिले आहे अशी लेखी नोटीस देईल.

(२) नंतर महानगर प्राधिकरण संबंधित व्यक्तींकडून देय असलेल्या सुधार आकाराची रक्कम अशा व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, निर्धारित करील आणि अशी व्यक्ती महानगर प्राधिकरणाकडून अशा निर्धारणाची लेखी नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत, आपणास निर्धारित रक्कम मान्य आहे किंवा अमान्य आहे याबद्दल एका लेखी घोषणापत्राद्वारे महानगर प्राधिकरणास कळवील.

(३) ज्या बाबतीत, महानगर प्राधिकरणाने, प्रस्तावित केलेले निर्धारण पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत संबंधित व्यक्तीकडून मान्य करण्यात येईल त्या बाबतीत असे निर्धारण अंतिम राहील.

(४) जर संबंधित व्यक्ती निर्धारण अमान्य करील किंवा पोट-कलम (२) द्वारे आवश्यक असलेली माहिती, त्यात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत देण्यात कसूर करील तर लगत नंतरच्या कलमात तरतूद केलेल्या रीतीने लवादांतर्फे त्या बाबीचा निर्णय करण्यात येईल.

लवादाद्वारे सुधार आकाराबाबत समझोता.

२८. (१) लगतपूर्वीच्या कलमाचे पोट-कलम (४) यामध्ये निर्देश केलेल्या बाबींचा निर्णय करण्यासाठी, राज्य शासन, तीन लवाद नेमील, त्यापैकी एक शहर दिवाणी न्यायालयाचा न्यायाधीश किंवा जिल्हा न्यायाधीश असेल किंवा अशा न्यायाधीशाच्या पदावर काम केलेला असेल आणि इतर हे विहित करण्यात येईल अशी तांत्रिक अर्हता असणारे असतील.

(२) लवाद, विहित करण्यात येईल अशी कार्यपद्धती अनुसरतील.

(३) लवादांना, त्यांच्याकडे विचारार्थ पाठविलेल्या कोणत्याही बाबीचा निर्णय करण्याच्या प्रयोजनासाठी, दाव्याची न्यायचौकशी करताना, पुढील बाबतीत दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, अन्वये दिवाणी न्यायालयाकडे जे अधिकार निहित केलेले असतात तेच अधिकार असतील :— १९०८ चा ५.

(क) कोणत्याही व्यक्तीस समन्स काढून बोलावणे व तिला उपस्थित राहण्यास भाग पाडणे व तिची शपथेवर तपासणी करणे ;

(ख) कोणताही दस्तऐवज शोधून काढण्यास व दाखल करण्यास फर्माविणे ;

(ग) शपथपत्रावर पुरावा घेणे ;

(घ) कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून कोणत्याही सरकारी अभिलेखाची मागणी करणे ;

(ङ) साक्षीदारांच्या तपासणीसाठी आयोगपत्रे काढणे.

(४) लवादांमध्ये कोणताही मतभेद झाल्यास बहुमताचा निर्णय अधिभावी होईल आणि तो निर्णय लवादांचा निवाडा असेल.

(५) जर कोणताही लवाद मरण पावेल, राजीनामा देईल किंवा पोट-कलम (६) अन्वये त्याला काढून टाकण्यात येईल किंवा राज्य शासनाच्या मते त्याची कर्तव्ये पार पाडण्यास त्याने नकार दिला असेल किंवा कर्तव्ये पार पाडण्याकडे दुर्लक्ष केले असेल किंवा ती पार पाडण्यास तो असमर्थ झाला असेल तर राज्य शासन, तात्काळ, अशा लवादाच्या जागी दुसऱ्या पात्र व्यक्तीची नेमणूक करील.

(६) राज्य शासनास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, जर त्याची अशी खात्री होईल की,—

(क) लवादाने स्वतः गैरवर्तणूक केली आहे, तर राज्य शासनास त्याला अधिकारपदावरून काढून टाकता येईल ;

(ख) लवादांचा निवाडा अयोग्य रीतीने मिळविण्यात आलेला आहे किंवा अशा निवाड्याच्या संबंधात कोणत्याही लवादाने स्वतः गैरवर्तणूक केली आहे, तर राज्य शासनास निवाडा रद्द करता येईल.

(७) पोट-कलम (६), खंड (ख) अन्वये राज्य शासनाने जो रद्द केला नसेल असा निवाडा अंतिम असेल आणि कोणत्याही न्यायालयात त्याविरुद्ध हरकत घेता येणार नाही.

१९४० चा १०. (८) लवाद अधिनियम, १९४० च्या तरतुदी या कलमाखालील लवादाला लागू होणार नाहीत.

**सुधार आकार देणे.**

२९. (१) या अधिनियमान्वये बसवलेला सुधार आकार, नियमांद्वारे निश्चित करण्यात येईल इतक्या हप्त्यांत देय होईल आणि प्रत्येक हप्ता नियमांद्वारे निश्चित करण्यात येईल अशा वेळी व अशा रीतीने देय होईल.

(२) सुधार आकाराच्या कोणत्याही थकबाकीवर, विहित दरानुसार व्याज आकारले जाईल व ते, जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसुलीयोग्य असेल.

**सुधार आकार हा, जमिनीवरील प्रथम भार असणे.**

३०. (१) सुधार आकार देण्यास दायी असलेल्या कोणत्याही व्यक्तीस सुधार आकाराची रक्कम महानगर प्राधिकरणास देण्याऐवजी तिला उक्त रक्कम जमिनीतील आपल्या हितसंबंधावरील भार असल्याप्रमाणे थकित राहू देण्याबाबत, त्यावरील व्याज विहित दराने अखंडितपणे देण्याच्या अधीनतेने महानगर प्राधिकरणाशी करार करता येईल. अशा व्याजाचे पहिले वार्षिक प्रदान हे या नियमांनुसार निश्चित करण्यात येईल अशा वेळी व अशा रीतीने करण्यात येते :

परंतु, कोणत्याही व्यक्तीने व्याजाचे पहिले प्रदान केल्याच्या दिनांकापासून दहा वर्षांच्या कालावधीत तिला, कोणत्याही वेळी, सुधार आकार ठोक रकमेत पूर्णपणे देता येईल व त्यानंतर, तिने केलेला करार समाप्त होईल आणि जमिनीतील स्वतःच्या हितसंबंधावर तिने निर्माण केलेल्या भाराचेही परिमोचन होईल.

(२) सुधार आकाराच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीकडून देय असलेले प्रत्येक प्रदान, आणि पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेला प्रत्येक आकार, त्या त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असेल तरी, परंतु शासनाच्या किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही देय रकमांच्या प्रदानास अधीन राहून, अशा जमिनीतील अशा व्यक्तीच्या हितसंबंधावरील पहिला भार असेल.

---

## प्रकरण सात

## महानगर प्राधिकरणास विवक्षित अधिनियमिती रूपभेदांसह किंवा रूपभेदांशिवाय लागू करणे किंवा त्यापासून सूट देणे

**विवक्षित रूपभेद इत्यादींसह विवक्षित अधिनियमिती प्राधिकरणास लागू करणे.**

३१. अनुसूची दोनमध्ये नमूद करण्यात आलेल्या अधिनियमिती, रूपभेदांसह किंवा रूपभेदांशिवाय महानगर प्राधिकरणास लागू होतील किंवा लागू होणार नाहीत, आणि त्या अनुसूचीत नमूद करण्यात आलेल्या मर्यादेपर्यंत आणि नमूद करण्यात आलेल्या रीतीने त्या सुधारण्यात येतील.

## प्रकरण आठ

## जमिनीचे संपादन

जमीन संपादन करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

३२. (१) महानगर प्राधिकरणाच्या कोणत्याही अभिवेदनावरून राज्य शासनाला असे दिसून येईल की, प्राधिकरणाला आपली कोणतीही कार्ये पार पाडण्यास आणि आपल्या कोणत्याही अधिकाराचा वापर करण्यास समर्थ करण्यासाठी किंवा त्याचे कोणतेही प्रकल्प किंवा योजना किंवा विकास कार्यक्रम पार पाडण्यासाठी [१][ किंवा त्याच्याकडून किंवा कोणत्याही मान्यताप्राप्त एजन्सीमार्फत कोणत्याही सोयींची तरतूद करण्यासाठी ] महानगर प्रदेशाच्या कोणत्याही भागातील कोणतीही जमीन संपादन करणे आवश्यक आहे, तर राज्य शासनास, या कलमास अनुसरून ती जमीन संपादन करण्याचे राज्य शासनाने ठरविले आहे अशा अर्थाची अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध करून, ती जमीन संपादन करता येईल :

परंतु, अशी अधिसूचना प्रसिद्ध करण्यापूर्वी, राज्य शासनास, राजपत्रात प्रसिद्ध करावयाच्या विहित रीतीने बजावावयाच्या अधिसूचनेद्वारे, अशा जमिनीच्या मालकास किंवा शासनाच्या मते ज्या व्यक्तीचा अशा जमिनीत हितसंबंध असेल अशा इतर कोणत्याही व्यक्तीस, ती जमीन का संपादन करण्यात येऊ नये याबद्दल कारण दर्शविण्यास फर्मावता येईल आणि मालकाकडून किंवा जमिनीत हितसंबंध असलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीकडून दर्शविण्यात आलेले कोणतेही कारण असल्यास, ते विचारात घेतल्यानंतर, राज्य शासनास, त्यास योग्य वाटेल असा आदेश देता येईल.

[२][ **स्पष्टीकरण**—या प्रकरणाच्या प्रयोजनासाठी, " मान्यताप्राप्त एजन्सी " म्हणजे केंद्र सरकारचा किंवा राज्य शासनाचा कोणताही विभाग किंवा स्थानिक प्राधिकरण किंवा कंपनी अधिनियम, १९५६ च्या कलम ६१७ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेली एखादी शासकीय कंपनी किंवा त्यावेळी अमलात असलेल्या कोणत्याही विधिद्वारे किंवा तदन्वये स्थापन करण्यात आलेले कोणतेही इतर महामंडळ किंवा शासकीय उपक्रम.]

(२) पोट-कलम (१) मध्ये नमूद करण्यात आलेल्या कोणत्याही प्रयोजनासाठी करण्यात आलेले जमिनीचे संपादन हे, सार्वजनिक प्रयोजनासाठी करण्यात आल्याचे समजण्यात येईल. [३][ आणि अशा प्रयोजनासाठी केलेले कोणत्याही जमिनीचे संपादन सर्व बाबतीत, या प्रकरणाच्या संबद्ध तरतुदींनुसार करण्यात येईल.]

(३) उपरोक्तप्रमाणे एखादी अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येईल तेव्हा ती जमीन ज्या दिनांकास अशी अधिसूचना अशा प्रकारे प्रसिद्ध करण्यात आली असेल त्या दिनांकास आणि त्या दिनांकापासून, सर्व बोजांपासून मुक्त होऊन राज्य शासनाकडे पूर्णपणे निहित होईल.

जमिनीचा कब्जा असणाऱ्या व्यक्तीस राज्य शासन इत्यादींना जमीन प्रत्यर्पित करण्यास किंवा तिचा कब्जा सुपूर्द करण्यास फर्मावण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

३३. (१) कलम ४३ च्या तरतुदींना अधीन राहून कलम ३२ च्या पोट-कलम (३) अन्वये कोणतीही जमीन राज्य शासनाकडे निहित असेल त्याबाबतीत, राज्य शासनास, जमिनीचा कब्जा असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस लेखी नोटीशीद्वारे, नोटीस बजावल्यापासून तीस दिवसांच्या आत, राज्य शासनाकडे किंवा त्याने याबाबतीत रीतसर प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे जमीन प्रत्यर्पित करण्याचा किंवा तिचा कब्जा सुपूर्द करण्याचा आदेश देता येईल.

(२) जर कोणत्याही व्यक्तीने पोट-कलम (१) खालील आदेशाचे अनुपालन करण्यात कसूर केली किंवा अनुपालन करण्याचे नाकारले तर, राज्य शासनास, जमिनीचा कब्जा घेता येईल आणि त्या प्रयोजनासाठी वाजवीरीत्या आवश्यक असेल अशा बळाचा वापर करता येईल.

(३) पूर्वोक्तप्रमाणे कोणत्याही जमिनीचा कब्जा घेण्यात आला असेल त्याबाबतीत, राज्य शासन ती जमीन महानगर प्राधिकरणासाठी, त्याची कामे पार पाडण्याच्या व त्याच्या अधिकारांचा वापर करण्याच्या प्रयोजनासाठी [४][ किंवा यथास्थिति, ज्यासाठी जमीन संपादन करण्यात आली त्या सोयीची तरतूद करण्यासाठी, मान्यताप्राप्त एजन्सीला ] उपलब्ध करून देईल.

---

१ सन् १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१, कलम २ (अ) द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

२ वरील अधिनियमाच्या कलम २ (ब) द्वारे शेवटी स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात आले.

३ सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ च्या कलम ६ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

४ सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१ कलम ३ द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

३४. या प्रकरणाखाली संपादन केलेल्या कोणत्याही जमिनीत कोणताही हितसंबंध असणाऱ्या व्यक्तीस, या प्रकरणात यानंतर तरतूद केल्याप्रमाणे राज्य शासनाकडून रक्कम मिळविण्याचा हक्क राहील. संपादनासाठी रक्कम मिळण्याचा अधिकार.

## नगरपालिका क्षेत्रांतील जमिनी

३५. (१) या प्रकरणान्वये कोणतीही जमीन (त्यावरील कोणत्याही इमारतीसह) संपादन करण्यात आली असेल व राज्य शासनाकडे निहित करण्यात आली असेल आणि ती बृहन्मुंबई किंवा महानगर क्षेत्रातील कोणत्याही नगरपालिका क्षेत्राच्या अधिकारक्षेत्रामधील कोणत्याही क्षेत्रात असेल त्याबाबतीत, राज्य शासन, अशा संपादनाबद्दल, या कलमाच्या तरतुदींनुसार ठरविण्यात येईल, अशी रक्कम देईल. नगरपालिका क्षेत्रांतील जमिनींच्या संपादनाबद्दल रक्कम निर्धारित करण्याची मूलतत्त्वे.

(२) राज्य शासन व जिला रक्कम देय असेल अशी व्यक्ती यांच्यातील कराराद्वारे, प्राधिकरणाच्या सहमतीने रक्कम निर्धारित करण्यात आली असेल त्या बाबतीत, ती रक्कम अशा करारानुसार निर्धारित करण्यात येईल व देण्यात येईल.

(३) असा कोणताही करार करणे शक्य नसेल त्या बाबतीत, संपादन करण्यात आलेल्या कोणत्याही जमिनीच्या संबंधात देय असलेली रक्कम ही, सक्षम प्राधिकारी निर्धारित करील त्याप्रमाणे कलम ३२ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या लागोपाठच्या पाच वर्षांच्या कालावधीत, अशा जमिनीपासून प्रत्यक्षात मिळालेल्या निव्वळ सरासरी मासिक उत्पन्नाच्या शंभर पटींइतकी, असेल.

(४) पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या निव्वळ सरासरी मासिक उत्पन्नाची परिगणना अनुसूची तीनमध्ये ठरवून दिलेल्या रीतीने व तत्त्वांनुसार करण्यात येईल.

(५) सक्षम प्राधिकारी, विहित रीतीने चौकशी केल्यानंतर, पोट-कलम (४) च्या तरतुदींनुसार जमिनीपासून प्रत्यक्षात मिळालेले निव्वळ सरासरी मासिक उत्पन्न निर्धारित करील. सक्षम प्राधिकारी त्यानंतर, जमिनीवर ठळक ठिकाणी एक नोटीस प्रसिद्ध करील आणि ती विहित रीतीने बजावील आणि जमिनीचा मालक व तीत हितसंबंध असलेली प्रत्येक व्यक्ती यांना, सक्षम प्राधिकाऱ्याने निर्धारित केलेले जमिनीपासून प्रत्यक्षात मिळणारे निव्वळ सरासरी मासिक उत्पन्न अशा मालकास किंवा व्यक्तीस संमत आहे किंवा नाही हे, नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या दिनांकापूर्वी कळविण्याबद्दल फर्मावील. असा मालक किंवा व्यक्ती ते संमत नसेल तर असे निव्वळ सरासरी उत्पन्न किती आहे असा त्याचा दावा आहे ते सक्षम प्राधिकाऱ्यास विनिर्दिष्ट दिनांकापूर्वी कळवील.

(६) सक्षम प्राधिकाऱ्याने पोट–कलम (५) अन्वये निर्धारित केलेले निव्वळ सरासरी मासिक उत्पन्न आणि त्या आधारे द्यावयाची संपादनाबद्दलची रक्कम जिला संमत नसेल आणि त्या रकमेपेक्षा अधिक रकमेची जी मागणी करीत असेल अशा कोणत्याही व्यक्तीस पोट–कलम (५) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, न्यायाधिकरणाकडे अपील करता येईल.

(७) अपील करण्यात आल्यावर, न्यायाधिकरण अपीलदाराची बाजू ऐकून घेतल्यानंतर, निव्वळ सरासरी उत्पन्न आणि त्या आधारे देण्यात यावयाची रक्कम निर्धारित करील आणि त्याचा निर्णय अंतिम असेल आणि कोणत्याही न्यायालयात त्यावर हरकत घेता येणार नाही.

३६. (१) जमिनीचा मालक किंवा तीवरील इमारतीचा मालक हे वेगवेगळे असतील किंवा निकटपूर्वीच्या कलमान्वये निर्धारित केलेल्या संपादनाबद्दल द्यावयाच्या रकमेवर अनेक व्यक्ती हितसंबंध असल्याचे सांगत असतील त्याबाबतीत, सक्षम प्राधिकारी, त्याच्या मते रक्कम मिळण्याचा ज्यांना हक्क आहे अशा व्यक्ती आणि त्यांच्यापैकी प्रत्येकास देय असलेली रक्कम निर्धारित करील. भूमी संपादनाबद्दलच्या रकमेचे संविभाजन.

(२) अशी रक्कम किंवा तिचा कोणताही भाग, याच्या संविभाजनासंबंधी, किंवा ज्यांना ती रक्कम किंवा तिचा कोणताही भाग देय असेल अशा व्यक्तीसंबंधी कोणताही विवाद निर्माण झाला तर, सक्षम प्राधिकाऱ्यास, तो विवाद न्यायाधिकरणाच्या निर्णयासाठी, त्याच्याकडे पाठविता येईल; आणि
१८९४ अशा कोणत्याही विवादाचा निर्णय करताना, न्यायाधिकरण, भूमी संपादन अधिनियम, १८९४, याच्या
चा १. भाग तीनच्या तरतुदींचे अनुसरण करील.

संपादनाची रक्कम देणे किंवा ती न्यायालयात जमा करणे.

३७. (१) संपादनाबद्दलची रक्कम निर्धारित करण्यात आल्यानंतर, सक्षम प्राधिकारी राज्य शासनाच्या वतीने, ती रक्कम मिळण्याचा हक्क असणाऱ्या व्यक्तींना ती रक्कम देऊ करील आणि तिचे प्रदान करील.

(२) संपादनाची रक्कम मिळण्याचा हक्क असणाऱ्या व्यक्ती ती रक्कम घेण्यास तयार नसतील किंवा ती रक्कम मिळण्याच्या हक्काबद्दल किंवा तिच्या संविभाजनाबद्दल कोणताही विवाद असेल तर सक्षम प्राधिकारी, ती रक्कम बृहन्मुंबईत, मुंबई शहर दिवाणी न्यायालयात आणि इतर नगरपालिका क्षेत्रात, जिल्हा न्यायाधीशाच्या न्यायालयात जमा करील आणि ते न्यायालय अशा रीतीने ठेवलेल्या रकमेच्या बाबतीत, भूमी संपादन अधिनियम, १८९४, याची कलमे ३२ व ३३ मध्ये घालून दिलेल्या रीतीने व्यवहार करील. १८९४ चा १.

संपादन इ. बद्दलची रक्कम निर्धारित करण्या-संबंधातील सक्षम प्राधिकाऱ्याचा अधिकार.

३८. (१) सक्षम प्राधिकाऱ्यास, संपादनाची रक्कम किंवा तिचे संविभाजन निर्धारित करण्याच्या प्रयोजनासाठी, कोणत्याही व्यक्तीस, आदेशाद्वारे त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी, तिच्या ताब्यात असलेली संबद्ध माहिती पुरविण्यास, फर्मावता येईल.

(२) सक्षम प्राधिकाऱ्यास, कलम ३३ अन्वये चौकशी करताना, दिवाणी न्यायालयास, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, खालील खटल्याची न्यायचौकशी करताना जे अधिकार असतात तेच सर्व अधिकार पुढील बाबींच्या संबंधात असतील :— १९०८ चा १.

(क) कोणत्याही व्यक्तीस समन्स काढून बोलावणे व तिला उपस्थित राहण्यास भाग पाडणे व तिची शपथेवर तपासणी करणे ;

(ख) कोणतेही दस्तऐवज शोधून काढण्यास व दाखल करण्यास फर्माविणे ;

(ग) शपथपत्रावर पुरावा घेणे ;

(घ) कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून कोणत्याही सरकारी अभिलेखाची मागणी करणे ;

(ङ) साक्षीदाराच्या तपासणीसाठी आयोगपत्रे काढणे.

व्याज देणे.

३९. जमिनीचा ताबा घेण्याच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी संपादनाची रक्कम देण्यात किंवा जमा करण्यात आली नसेल तेव्हा, सक्षम प्राधिकारी, राज्य शासनाच्या वतीने, अशा रीतीने कब्जा घेतल्याच्या वेळेपासून अशा रीतीने रक्कम देण्यात किंवा जमा करण्यात येईपर्यंत, पहिल्या सहा महिन्यांसाठी दरसाल दरशेकडा ४ टक्के दराने व त्यानंतर दरसाल दरशेकडा ९ टक्के दराने व्याजासह ठरविण्यात आलेली रक्कम देईल.

सक्षम प्राधिकाऱ्याची नेमणूक.

४०. राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, त्याच्या मते, उप जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा कार्यकारी अभियंत्याच्या दर्जापेक्षा कमी नसेल असे पद जो धारण करीत आहे किंवा ज्याने धारण केले आहे अशा अधिकाऱ्याची या प्रकरणाच्या पूर्वगामी तरतुदींच्या प्रयोजनार्थ प्राधिकारी म्हणून नेमणूक करता येईल व कोणत्याही नगरपालिकेच्या संपूर्ण क्षेत्रासाठी किंवा त्याच्या कोणत्याही भागासाठी असा एक किंवा त्यापेक्षा अधिक अधिकारी नेमता येतील.

न्यायाधिकरणाची नेमणूक.

४१. राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, न्यायाधिकरणाची रचना करता येईल. असे न्यायाधिकरण, अध्यक्ष (जी व्यक्ती, शहर दिवाणी न्यायालयाचा न्यायाधीश किंवा जिल्हा न्यायाधीश याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचे नसेल असे न्यायिक पद कमीत कमी पाच वर्षांपर्यंतच्या कालावधीसाठी धारण करीत असेल किंवा जिने ते धारण केले असेल अशी व्यक्ती) आणि उप संचालक, नगररचना, याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचे नसेल असे पद जी धारण करीत असेल किंवा जिने धारण केले असेल अशी व्यक्ती व शासनाच्या अधीक्षक अभियंत्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचे नसेल असे पद जी धारण करीत असेल किंवा जिने धारण केले असेल अशी व्यक्ती यांचे मिळून होईल.

## ग्रामीण क्षेत्रातील जमिनी

ग्रामीण क्षेत्रांमधील भूमी संपादनासाठी रक्कम ठरविण्याची मूलतत्त्वे व इतर कार्यपद्धती.

४२. (१) या प्रकरणाअन्वये कोणतीही जमीन (तीवरील कोणतीही इमारत धरून) संपादन करण्यात आली असेल व ती राज्य शासनाकडे निहित झालेली असेल व ती बृहन्मुंबई वगळून महानगरप्रदेशाच्या कोणत्याही भागात आणि कोणत्याही नगरपालिकेच्या अधिकारक्षेत्रामधील कोणत्याही क्षेत्रात (या प्रकरणात ज्याचा " ग्रामीण क्षेत्रे " असा निर्देश करण्यात आला आहे) असेल त्या बाबतीत, राज्य शासन अशा संपादनासाठी, या कलमाच्या तरतुदींनुसार ठरविण्यात येईल अशी रक्कम देईल.

(२) राज्य शासन व जिला रक्कम देय असेल अशी व्यक्ती यांच्यामध्ये, अधिकरणाच्या सहमतीने, करारान्वये अशी रक्कम ठरविण्यात आली असेल त्या बाबतीत, अशी रक्कम अशा करारानुसार ठरविण्यात येईल व ती देण्यात येईल.

(३) असा कोणताही करार होऊ शकत नसेल त्याबाबतीत राज्य शासन ते प्रकरण
१८९४ जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवील आणि तो, भूमी संपादन अधिनियम, १८९४ यामध्ये भरपाई निश्चित
चा १. करण्यासाठी ठरवून दिलेल्या तत्त्वानुसार संपादनाची रक्कम निर्धारित करील आणि त्या अधिनियमाच्या तरतुदी (न्यायालयाकडे निर्देशित करण्यासंबंधीच्या आणि अपिलासंबंधीच्या तरतुदी धरून) भूमी संपादन अधिनियमाची कलमे २३ व २४ यांमध्ये, कलम ४, पोट–कलम (१) खालील अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकासंबंधीचे निर्देश हे, कलम ३०, पोट–कलम (१) च्या परंतुकाखालील नोटीस ज्या दिनांकास प्रसिद्ध करण्यात येईल त्या दिनांकासंबंधीचे निर्देश आहेत आणि कलम ६ खालील प्रतिज्ञापनांच्या प्रसिद्धीची वेळ किंवा दिनांक यासंबंधीचे निर्देश हे या अधिनियमाच्या कलम ३२, पोट–कलम (३) खालील अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध करण्यासंबंधातील दिनांकासंबंधीचे निर्देश आहेत या फेरबदलांस अधीन राहून, त्या अधिनियमाच्या तरतुदींखाली ही जमीन संपादन करण्यात आली आहे आणि त्यांसाठी भरपाई निश्चित करावयाची, संविभाजित करावयाची व द्यावयाची असल्याप्रमाणे त्यास, योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.

१८९४ **स्पष्टीकरण**.––या कलमात " जिल्हाधिकारी " म्हणजे, जिल्ह्याचा जिल्हाधिकारी, व त्यामध्ये, भूमी
चा १. संपादन अधिनियम, १८९४ खालील जिल्हाधिकाऱ्याची कामे पार पाडण्यासाठी राज्य शासनाने किंवा आयुक्ताने विशेष रीत्या नेमणूक केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यांचा समावेश होतो.

## पर्यायी निवास व्यवस्था

संपादन करण्यात आलेली कोणतीही इमारत पाडण्यात यावयाची असेल त्या बाबतीत, निवासी जागांच्या भोगवटादारांसाठी पर्यायी निवास व्यवस्था.

४३. या प्रकरणान्वये कोणतीही इमारत संपादन करण्यात येईल आणि ती प्राधिकरणाकडे निहित करण्यात येऊन ती पाडण्याचे प्रस्तावित करण्यात येईल त्याबाबतीत, भोगवटादारांना काढून टाकण्यापूर्वी त्या इमारतीत निवासी जागांचा, जे मालक किंवा भाडेकरू म्हणून भोगवटा करीत असतील आणि इमारत पाडण्याच्या वेळी तीत जे प्रत्यक्ष निवास करत असतील अशा व्यक्तींसाठीच केवळ, प्राधिकरणास योग्य वाटेल अशा ठिकाणी आणि अशा प्रकारची व आकाराची आणि उक्त प्राधिकरण ठरवील अशा अटींवर व शर्तीवर पर्यायी निवास व्यवस्थेची तरतूद करणे हे प्राधिकरणाचे कर्तव्य असेल, जर कोणताही भोगवटादार त्याला वाटून देण्यात आलेल्या पर्यायी निवास व्यवस्थेचे वाटप झाल्याच्या दिनांकापासून ४५ दिवसांच्या आत तिचा स्वीकार करून भोगवटा करण्यात कसूर करील तर, त्याच्यासाठी अशा जागेची तरतूद करण्यासंबंधातील प्राधिकरणाची जबाबदारी संपेल. या कलमातील कोणत्याही बाबीसंबंधातील प्राधिकरणाचा निर्णय अंतिम असेल आणि कोणत्याही न्यायालयात त्याविरुद्ध कोणतीही हरकत दाखल करता येणार नाही.

**स्पष्टीकरण** [1][एक].––या कलमातील " इमारत " म्हणजे भाड्याने दिलेले किंवा भाड्याने देण्याचा इरादा असलेले किंवा स्वतंत्रपणे भोगवट्यात असलेले एखादे घर किंवा गाळा, किंवा गाळे,
१८८८ परंतु, त्यामध्ये मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३, खंड (धख) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे
चा जी अनधिकृत असेल किंवा जी तात्पुरती असेल अशा कोणत्याही इमारतीचा समावेश होणार नाही.
मुंबई [2][**स्पष्टीकरण दोन**––या प्रकरणान्वये संपादन केलेली कोणतीही इमारत ही मान्यताप्राप्त
३. एजन्सीकडे निहित करण्यात आली असेल त्याबाबतीत, या कलमातील प्राधिकरणासंबंधीचे सर्व निर्देश हे संबंधित एजन्सीचे निर्देश असल्याप्रमाणे त्यांचा अर्थ लावण्यात येईल.]

---

[1] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३१, कलम ४ द्वारे मूळ स्पष्टीकरणाला " स्पष्टीकरण एक " असा क्रमांक देण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या वरील कलमाद्वारे " स्पष्टीकरण दोन " जादा दाखल करण्यात आले.

## प्रकरण नऊ

### संकीर्ण

प्राधिकरणाला देय असलेल्या पैशांची जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसुली करणे.

४४. (१) जेव्हा कोणत्याही स्पष्ट वा गर्भित अर्थाच्या करारान्वये किंवा अन्यथा, प्राधिकरणास देय असलेली (कोणत्याही महानगर प्राधिकरणाच्या जागेच्या संबंधात देय असलेले भाडे नसेल अशी) कोणतीही रक्कम, नियत दिनांकास किंवा त्या दिनांकापूर्वी देण्यात आली नसेल, त्या बाबतीत,—

(क) आणि हक्क मागणीसंबंधात विवाद नसेल तर, प्राधिकरणाद्वारे रीतसर प्राधिकृत करण्यात आलेली व्यक्ती, ज्यात रक्कम दर्शविली आहे असे प्रमाणपत्र, स्वतःच्या सहीने, जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवील आणि त्यानंतर जिल्हाधिकारी, ती देय असलेली किंवा मागणी करण्यात आलेली रक्कम, जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करील.

(ख) आणि, हक्क मागणीसंबंधात विवाद असल्यास, त्या प्रयोजनासाठी राज्य शासनाकडून रचना करण्यात आलेल्या न्यायाधिकरणाकडे तो वाद निर्णयार्थ पाठवण्यात येईल, व न्यायाधिकरण, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर व जिच्याकडून रक्कम देय असल्याचे अभिकथित असेल त्या व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर त्या प्रश्नाचा निर्णय करील; आणि प्राधिकरणाचा निर्णय हा अंतिम असेल आणि त्याविरुद्ध कोणत्याही न्यायालयात किंवा अन्य कोणत्याही प्राधिकरणापुढे आक्षेप घेता येणार नाही. त्यानंतर, जिल्हाधिकारी, देय म्हणून निर्धारित करण्यात आलेली रक्कम जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करील.

(२) न्यायाधिकरण हे, जी, प्राधिकरणाशी किंवा जिच्याकडून रक्कम देय असल्याचे अभिकथित असेल अशा व्यक्तीशी संबंधित नसेल अशा एका व्यक्तीचे मिळून बनेल.

(३) न्यायाधिकरणाचा खर्च हा प्राधिकरणाकडून करण्यात येईल.

(४) न्यायाधिकरणाने, त्याच्याकडे निर्णयार्थ सोपविण्यात आलेल्या प्रश्नांचा निर्णय करताना अनुसरावयाची पद्धती ही, विहित केल्याप्रमाणे असेल.

स्थानिक प्राधिकरणांनी बसवलेल्या करांऐवजी प्राधिकरणाकडून ठोक रकमेचे अंशदान.

४५. (१) या अधिनियमान्वये करण्यात येतील असे कोणतेही नियम असल्यास, त्यांना अधीन राहून आणि स्थानिक प्राधिकरण ज्यांची तरतूद करते अशा सर्व किंवा कोणत्याही सुखसोयींची महानगर प्राधिकरण स्वतःच स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकारक्षेत्रात तरतूद करीत असते ही गोष्ट लक्षात घेता प्राधिकरण, मालमत्ता कर कोणताही असल्यास, तो धरून कोणतेही कर देण्यास दायी असणार नाही. परंतु, स्थानिक प्राधिकरणाकडून देण्यात येणाऱ्या सेवा किंवा त्याने बसवलेले सर्व कर अथवा कोणताही कर याऐवजी स्थानिक प्राधिकरणास देण्यात येणारे ठोक रकमेच्या स्वरूपातील अंशदान देण्यास राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने स्थानिक प्राधिकरणाने, प्राधिकरणाबरोबर करार करणे हे कायद्याला धरून असेल.

(२) पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असा कोणताही करार होऊ शकत नसेल त्या बाबतीत ती बाब राज्य शासन निश्चित करील त्या रीतीने राज्य शासनाकडे पाठवता येईल आणि राज्य शासनास स्थानिक प्राधिकरणाला, प्राधिकरणाला किंवा या दोघांनाही आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, अशा अंशदानाची रक्कम निश्चित करता येईल. राज्य शासनाचा निर्णय दोन्ही पक्षकारांवर बंधनकारक असेल.

४६. (१) महानगर प्राधिकरणाशी व्यवहार करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, अशा प्राधिकरणाच्या वतीने असा करार करता येईल. त्यामध्ये अशी तरतूद करता येईल की, करारामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल इतकी रक्कम मालकाकडून त्याला देय असलेल्या वेतनामधून किंवा मजुरीमधून वजा करण्यास आणि प्राधिकरणाचे अशा व्यक्तीच्या नावे असलेले कोणतेही कर्ज भागविण्यासाठी किंवा प्राधिकरणाची मागणी पूर्ण करण्यासाठी, अशा रीतीने वजा केलेली रक्कम प्राधिकरणाला देण्यास मालक सक्षम असेल. विवक्षित प्रकरणी प्राधिकरणाची मागणी पूर्ण करण्यासाठी वेतनातून किंवा मजुरीतून रक्कम वजा करणे.

(२) असा करार केल्यानंतर, मालक, प्राधिकरण लेखी मागणीद्वारे तसे फर्मावील तर, आणि जोपर्यंत अशा कर्जाची किंवा मागणीची पूर्णपणे फेड झाल्याचे प्राधिकरणांकडून कळवण्यात येत नाही तोपर्यंत, १९३६ चा ४. करारानुसार रक्कम वजा करीत राहील आणि अशा रीतीने वजा केलेली रक्कम, जणू ती वेतन प्रदान अधिनियम, १९३६ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे मालकाने द्यावयाच्या वेतनाचा किंवा मजुरीचा भाग आहे असे समजून, मालक वेतनाची रक्कम ज्या दिवशी प्रदान करील त्या दिवशी प्राधिकरणास देईल.

(३) पूर्ववर्ती पोट-कलमान्वये करण्यात आलेली लेखी मागणी मिळाल्यानंतर जर मालक कोणत्याही वेळी, मागणीत विनिर्दिष्ट करण्यात आलेली रक्कम, अशा व्यक्तीस, देय असलेल्या वेतनातून किंवा मजुरीतून वजा करण्यात किंवा वजा केलेल्या रकमेचा प्राधिकरणाकडे भरणा करण्यात कसूर करील तर तो मालक, त्या रकमेच्या प्रदानास व्यक्तिशः दायी राहील आणि प्राधिकरणाच्या वतीने ती रक्कम जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे मालकाकडून वसूल करता येईल.

(४) या कलमातील कोणताही मजकूर (संविधानाच्या अर्थानुसार), कोणत्याही रेल्वेत आणि खाणीत व तेलक्षेत्रात नोकरीला असणाऱ्या व्यक्तींना लागू होणार नाही.

[1][४६-क. (१) महानगर प्रदेशातील क्षेत्रांच्या विकासाकरिता राज्य शासनाकडून आखण्यात आलेल्या धोरणानुसार व त्याने वेळोवेळी घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार महानगर प्राधिकरण, या अधिनियमाखालील आपल्या अधिकारांचा वापर करील व आपली कर्तव्ये पार पाडील. राज्य शासनाचे नियंत्रण.

(२) या अधिनियमाच्या कार्यक्षम अंमलबजावणीसाठी, राज्य शासनाकडून वेळोवेळी देण्यात येतील अशा निदेशांचे पालन करणे प्राधिकरणावर बंधनकारक राहील.

(३) प्राधिकरणाच्या या अधिनियमाखालील अधिकारांच्या वापराबाबत किंवा कर्तव्ये पार पाडण्याबाबत प्राधिकरण व राज्य शासन यांच्यात कोणताही विवाद उद्‌भवल्यास, त्याचा निर्णय राज्य शासनाकडून करण्यात येईल व त्याचा निर्णय अंतिम असेल.

[४६-ख. महानगर प्राधिकरणास, या अधिनियमाखालील किंवा त्या त्यावेळी अमलात असलेल्या, इतर कोणत्याही कायद्याखालील त्याच्या अधिकाराचा वापर करण्यासाठी किंवा कर्तव्ये पार पाडण्यासाठी आवश्यक असेल असे कोणतेही विवरण, लेखा विवरणपत्र, अहवाल, आकडेवारी किंवा अन्य माहिती महानगर प्रदेशातील कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाकडून किंवा अन्य प्राधिकरणाकडून किंवा व्यक्तींकडून मागविण्याचा अधिकार असेल आणि असे प्राधिकरण किंवा व्यक्ती यांच्यावर अशी माहिती सादर करणे बंधनकारक असेल.] विवरणे, अहवाल इत्यादी मागविण्याचा प्राधिकरणाचा अधिकार.

[2][४६-ग. प्राधिकरणास, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये, त्याने वापरण्यायोग्य असलेला (विनियम करण्याचा अधिकार वगळून) इतर कोणताही अधिकार, किंवा त्याने बजावावयाचे कोणतेही कार्य किंवा पार पाडावयाचे कोणतेही कर्तव्य, ठरावाद्वारे, वेळोवेळी, त्या ठरावात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अटींना व शर्तींना अधीन राहून महानगर आयुक्ताकडे किंवा कार्यकारी समितीकडे सोपवता येईल.] अधिकार सोपविणे.

---

[1] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ च्या कलम २१ द्वारे कलमे ४६-क व ४६-ख समाविष्ट करण्यात आली.

[2] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९, कलम ८ द्वारे कलम " ४६-ग " जादा दाखल करण्यात आले.

महानगर प्राधिकरणाचे अधिकारी व इतर कर्मचारी लोकसेवक असणे.

४७. महानगर प्राधिकरणांचा प्रत्येक अधिकारी आणि इतर कर्मचारी [1][व या अधिनियमान्वये घटित करण्यात आलेल्या [2][ * * * ] समित्यांचे कोणतेही सदस्य] हे भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. १९३६ चा ४.

दायित्व निराकरण.

४८. या अधिनियमाखाली सद्भावनेने केलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल महानगर प्राधिकरणाच्या कोणत्याही सदस्याविरुद्ध किंवा कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध किंवा इतर कर्मचाऱ्याविरुद्ध [3][आणि या अधिनियमान्वये घटित करण्यात आलेल्या [2][* * *] समित्यांच्या कोणत्याही सदस्यांविरुद्ध] कोणताही दावा, खटला किंवा इतर न्यायालयीन कारवाई दाखल करता येणार नाही.

नियम करण्याचा अधिकार.

४९. (१) या अधिनियमान्वये सर्व नियम करण्याच्या अधिकारांचा वापर हा, राज्य शासनाकडून राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करून करण्यात येईल.

(२) या अधिनियमात, अन्यत्र अंतर्भूत असलेल्या नियम करण्याच्या कोणत्याही अधिकारास बाध येऊ न देता, राज्य शासनास, सामान्यतः या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता या अधिनियमाशी सुसंगत असे नियम करता येतील.

(३) या अधिनियमान्वये करण्यात आलेले सर्व नियम हे पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन असतील.

(४) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम हा, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, प्रत्येक सभागृहांपुढे ठेवण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे संमत होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे संमत होतील, आणि राजपत्रात असा निर्णय अधिसूचित करण्यात येईल, तर तो नियम अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून, केवळ अशा सुधारलेल्या स्वरूपात अमलात येईल किंवा, यथास्थिति, तो अमलात येणार नाही. तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा रद्द करणे यांमुळे, उक्त नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

विनियम करण्याचा अधिकार.

५०. महानगर प्राधिकरणास, वेळोवेळी या अधिनियमाखाली, विनियमाद्वारे तरतूद करावयाच्या सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी आणि सामान्यतः प्राधिकरणाच्या मते या अधिनियमाखालील आपल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि कामे पार पाडण्यासाठी ज्या इतर सर्व बाबींची तरतूद करणे आवश्यक असेल, अशा सर्व बाबींसाठी विनियम करता येतील.

---

[1] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ च्या कलम ७ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० च्या कलम १३ द्वारे " कार्यमंडळे, इतर मंडळे आणि " हा मजकूर वगळण्यात आला.

[3] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ च्या कलम ८ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

१९६६ चा महा. ३७. ५१. या अधिनियमाच्या तरतुदी कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाचे किंवा इतर प्राधिकरणाचे नियमन करणारा कोणताही कायदा किंवा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ किंवा त्या त्या वेळी अमलात असलेला इतर कोणताही कायदा यात तद्‌विरुद्ध असे काहीही अंतर्भूत असले तरी, परिणामक असतील. इतर कायद्यांशी विसंगत अशा तरतुदींचा प्रभाव.

५२. या अधिनियमाच्या तरतुदी अमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास प्रसंगानुसार आवश्यक असेल त्याप्रमाणे, परंतु महानगर प्राधिकरणाची स्थापना झाल्याच्या दिनांकापासून दोन वर्षांपेक्षा नंतरचा नाही अशा कालावधीत, आदेशाद्वारे अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक व इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या प्रयोजनांशी व उद्दिष्टांशी विसंगत नसणारी कोणतीही गोष्ट करता येईल. अडचणी दूर करण्याचा अधिकार.

---

## अनुसूची एक

[ कलम २, खंड (ख) पहा ]

मुंबई महानगर प्रदेश हा, पुढील सीमांमध्ये असलेले बृहन्मुंबईचे संपूर्ण क्षेत्र व ठाणे आणि कुलाबा या जिल्ह्यांचे भाग यांचा मिळून होईल :—

पश्चिम—अरबी समुद्र.

उत्तर—तानसा नदी,

पूर्व—कर्जत तालुक्यातील सह्याद्रीच्या पायथ्याशी असलेल्या टेकड्यांपर्यंत, कल्याण व भिवंडी या तालुक्यांच्या पूर्व सीमा.

दक्षिण—आपटा व गुळसुंदे या गावांपर्यंत, पाताळगंगा नदी व नंतर पेण तालुक्याच्या पुढील गावांची पूर्व सीमा.

दुसवी, कोशणखार, निदरखार, नवखार, खारबेलोई, बेलोली, आंबीवली, दावनसर, रामराज, धावटे; आणि नंतर पेण तालुक्याच्या पुढील गावांची दक्षिण सीमा.

वडगांव, मालेघर, कांडला, नायगांव आणि शिलोत्तरलंग; नंतर अलिबाग तालुक्याच्या पुढील गावांची दक्षिण सीमा.

शहापूर, भणगर, पोयनाड, आंबेघर, प्रिगांव, गणगाव, तर्फ परहार, सागांव, तळोली, खंडाळा, वेशवी व अलिबाग.

---

## अनुसूची दोन

(कलम ३१ पहा)

एक. मुंबई सरकारी जागा (काढून टाकण्याबाबत) अधिनियम, १९५५ (सन १९५६ चा मुंबई दोन).

राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असा निदेश देता येईल की, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापासून उक्त अधिनियम, त्यातील पुढील रूपभेदांस अधीन राहून सरकारी जागांच्या संबंधात जसा लागू होतो त्याचप्रमाणे तो महानगर प्राधिकरणाच्या मालकीच्या किंवा त्याने पट्ट्याने घेतलेल्या जमिनींच्या बाबतीत लागू होईल :—

(क) कलम २ मधील खंड (ख) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

१९७५ चा महा. ४. ' (ख) " प्राधिकरण " याचा अर्थ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ अन्वये स्थापन करण्यात आलेले, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, आणि " प्राधिकरणाच्या जागा " याचा अर्थ त्या प्राधिकरणाच्या मालकीच्या किंवा त्या प्राधिकरणाने पट्ट्याने घेतलेल्या जागा; ';

(ख) कलम ३ ऐवजी पुढील कलम दाखल करण्यात येईल:—

" ३. राज्य शासनास राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, त्याच्या मते, उप जिल्हा–अधिकारी किंवा कार्यकारी अभियंता यांच्या दर्जाहून जे कमी दर्जाचे नाही असे पद जो धारण करीत असेल किंवा ज्याने धारण केले असेल अशा अधिकाऱ्याची या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी सक्षम प्राधिकारी म्हणून नेमणूक करता येईल आणि संपूर्ण मुंबई महानगर प्रदेश किंवा त्याचा भाग यासाठी असा एक किंवा असे अनेक अधिकारी नेमता येतील. "; सक्षम प्राधिकाऱ्यांची नेमणूक.

(ग) त्या अधिनियमातील " सरकारी जागा " या संबंधीचे निर्देश हे " प्राधिकरणाच्या जागा " या संबंधीचे निर्देश असल्याचे आणि कलमे ४, ६ व ९ मधील राज्य शासनासंबंधीचे निर्देश हे " प्राधिकरणा " संबंधीचे निर्देश असल्याचे मानण्यात येईल ;

(घ) कलम ६ च्या पोट–कलम (१) मधील––

(एक) खंड (ख) नंतर पुढील शब्द व खंड समाविष्ट करण्यात येईल :––

" किंवा

(ग) प्राधिकरणाचा कोणताही कर्मचारी असेल. ".

(दोन) " किंवा यथास्थिति, स्थानिक प्राधिकरणाने " या मजकुरानंतर, " किंवा प्राधिकरणाने ", हे शब्द समाविष्ट करण्यात येतील.

**दोन.** महाराष्ट्र मालकी हक्काच्या फ्लॅटसबाबत (ते बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्था व हस्तांतरण यांचे नियमन करण्यासंबंधी) अधिनियम, १९६३ (सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५).

उक्त अधिनियम, महानगर प्राधिकरणास किंवा त्या प्राधिकरणाच्या मालकीच्या किंवा त्याच्याकडे निहित असलेल्या कोणत्याही जमिनीस किंवा इमारतीस लागू होणार नाही.

**तीन.** महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९).

उक्त अधिनियमात कलम ४०, पोट–कलम (१), खंड (ख) नंतर पुढील शब्द व खंड समाविष्ट करण्यात येईल :––

" किंवा

(क) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ या अन्वये स्थापन करण्यात आलेल्या, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची नेमणूक करून. " १९७५ चा महा. ४.

---

## अनुसूची तीन

[कलम ३५ चे पोट–कलम (४) पहा]

### निव्वळ सरासरी मासिक उत्पन्न निर्धारित करण्याची तत्त्वे

१. सक्षम प्राधिकरण, संपादन केलेल्या जमिनीवरील इमारतीसह, त्या जमिनीच्या मालकास कलम ३५, पोट–कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या लागोपाठच्या पाच वर्षांच्या कालवधीत प्रत्यक्षात मिळालेले एकूण भाडे प्रथम निर्धारित करील.

२. अशा निर्धारणासाठी, सक्षम प्राधिकरणास, कोणतीही स्थानिक चौकशी करता येईल आणि आवश्यकता असल्यास, अशा जमिनीचे भाडेमूल्य दर्शविणाऱ्या, संबंधित स्थानिक प्राधिकरणाच्या कर आकारणी पुस्तकातील उताऱ्यांच्या प्रमाणित प्रती मिळवता येतील.

३. कलम ३५, पोट–कलम (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेले निव्वळ सरासरी मासिक उत्पन्न हे, सरासरी एकूण मासिक भाड्यांच्या उत्पन्नाच्या साठ टक्के असेल आणि सरासरी मासिक स्थूल उत्पन्न हे, सक्षम प्राधिकाऱ्याने परिच्छेद १ अन्वये निर्धारित केलेल्या, लागोपाठच्या पाच वर्षांच्या कलावधीतील एकूण भाड्याच्या एक–साठांश असेल.

४. निव्वळ सरासरी मासिक उत्पन्न निर्धारित करताना, वर निर्दिष्ट केलेल्या एकूण मासिक भाड्याच्या चाळीस टक्के भाग विचारात घेण्यात येणार नाही, मात्र कोणताही मालमत्ता कर स्थानिक प्राधिकरणास देणे, वसुलीचा खर्च, प्राप्तीकर किंवा बुडीत कर्ज तसेच, जमिनीवर कोणतीही इमारत असल्यास तिच्या दुरुस्तीची कामे व परिरक्षण यांसाठी मालकाला सामान्यतः कराव्या लागणाऱ्या खर्चादाखल अशी चाळीस टक्के रक्कम वजा करण्यात येईल.

५. जमिनीचा किंवा तिच्या कोणत्याही भागाचा भोगवटा करण्यात येत नसेल किंवा पाच वर्षांच्या उक्त संपूर्ण कलावधीत किंवा त्याच्या भागात, मालकाला भोगवट्याबद्दल कोणतेही भाडे मिळालेले नसेल अशा बाबतीत, उक्त कालावधीत भाड्यासाठी जमीन पट्ट्याने देण्यात आली असती तर मालकाला वस्तुतः जे उत्पन्न मिळाले असते ते उत्पन्न, एकूण उत्पन्न म्हणून समजण्यात येईल आणि या प्रयोजनासाठी, जमीन ज्या कालावधीत रिकामी राहिली होती त्या कालावधीच्या पूर्वीच्या किंवा नंतरच्या कालावधीत तिच्यापासून किंवा सभोवतालच्या तत्सम जमिनीपासून प्रत्यक्षात मिळालेले भाडे विचारात घेण्यात येईल.

शा.मु.औ.–(एच) २६६–६०५०–११-२००६.

शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद